# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १८ जानेवारी २०२४

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०३ अंक - १५३

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 18 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-153 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


## राम, लक्ष्मण, सीता पोहोचले अयोध्येत

आधुनिक केसरी न्यूज

**अयोध्या :** 22 जानेवारीचा दिवस संपूर्ण देशवासियांसाठी ऐतिहासिक दिवस ठरणार आहे. यादिवशी अयोध्येतील राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडणार आहे. यासाठी सर्वजण उत्सुक आहेत. या सोहळ्यासाठी अयोध्येत जय्यत तयारी सुरू आहे. यादिवशी विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. यादरम्यान रामानंद सागर यांच्या 'रामायण' मालिकेतील मुख्य कलाकार अयोध्येत पोहोचले आहेत. मालिकेत राम, सीता आणि लक्ष्मणाची भूमिका साकारणारे कलाकार म्हणजेच अरुण गोविल, दीपिका चिखलिया आणि सुनील लहरी यांचे अयोध्येत जंगी स्वागत करण्यात आले. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर समोर आला आहे. रामायण मालिकेत सीतेची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री दीपिका चिखलिया यांनी लाल रंगाची साडी नेसली आहे. तर अरुण गोविल आणि सुनील लहरी हे पिवळ्या आणि पांढऱ्या रंगाच्या कुर्ता-पायजमामध्ये दिसत आहेत. या तिघांभोवती लोकांची बरीच गर्दी पहायला मिळतेय. काहींनी हातात झेंडेसुद्धा घेतले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांकडून लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव होतोय. काही दिवसांपूर्वी सुनील लहरी यांचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. ज्यामध्ये त्यांनी अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आमंत्रण मिळाले नसल्याची तक्रार केली होती. मात्र आता त्यांना अयोध्येत अरुण गोविल आणि दीपिका चिखलिया यांच्यासोबत पाहून चाहतेसुद्धा खुश झाले आहेत. बऱ्याच वर्षांनंतर प्रेक्षकांना हे तीन दिग्गज कलाकार एकत्र पहायला मिळत आहेत. रामायण या मालिकेची प्रचंड लोकप्रियता आहे.





लग्न होताच जोडीने खंडोबा दर्शनाला येऊन जेजुरीगडाच्या पायऱ्या आपल्या नवरीला कडेवर घेऊन चढण्याची शेकडो वर्षांची प्रथा आजही मोठ्या प्रमाणात पाळली जाते. याला चित्रसृष्टीतील कलावंतही कसे अपवाद असतील! ख्वाडा, बबन सारखे सुपरहिट सिनेमे देणारे भाऊसाहेब कऱ्हाडे हे देखील लग्नबंधनात अडकले असून त्यांनीही आपले कुलदैवत खंडोबाला येऊन नवरीला कडेवर घेतले. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

## शंकाखोरांनो हे वाचा... मुख्य रामलल्लाचे मंदिर कधीच पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : अयोध्येतील राम मंदिर तर तयार झाले आहे. रामलल्लाच्या मंदिरात गर्भगृह म्हणजे गाभारा आहे. तळमजल्यावर पाच मंडप आहेत. तळमजल्यावरचे मंदिर बांधून पूर्ण झाले आहे. पहिल्या मजल्यावर राम दरबार आहे. त्याचे बांधकाम बाकी आहे. तसेच दुसऱ्या मजल्यावर फक्त अनुष्ठान होणार जाईल. तिथे विविध प्रकारचे यज्ञ केले जाणार आहेत. त्यामुळे मुख्य रामलल्लाचे मंदिर तर कधीच पूर्ण झाले आहे, असा खुलासा मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी केला.**

अयोध्येत २२ जानेवारी रोजी प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोहळा होणार असल्यामुळे भाजपाच्या वतीने या सोहळ्यानिमित्त जोरदार तयारी केली जात आहे. त्यातच देशातील चार पिठाच्या शंकराचार्यांनी या सोहळ्याला उपस्थित राहणार नसल्याचे सांगितले. मंदिराचे बांधकाम अपूर्ण असल्यामुळे आताच प्राणप्रतिष्ठा करणे योग्य नाही, हे धर्म शास्त्राच्या विरोधात आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली. शंकराचार्यांच्या भूमिकेचा हवाला देऊन अनेक राजकीय नेत्यांनी भाजपावर मंदिर उद्घाटनाची घाई केल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर आता राम मंदिर निर्माण



समितीचे अध्यक्ष आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे माजी प्रधान सचिव नृपेंद्र मिश्रा यांनी मंदिराच्या बांधकामाबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. मिश्रा पुढे म्हणाले की, पूर्वीच्या काळात मंदिराचे बांधकाम करण्यासाठी ५० वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळ लागायचा. त्यामुळे तिथे देवाची स्थापन करणे थांबवायचे नाहीत. गाभाऱ्याचे काम झाल्यानंतर प्राणप्रतिष्ठा होऊन पूजाअर्चा करणे सुरू व्हायचे. हा विषय समजून न घेता बोलणे योग्य होणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

**२२ जानेवारी काय होणार ? :** २२ जानेवारी रोजी राम मंदिरात काय काय होणार आहे ? याचीही माहिती मिश्रा यांनी दिली . ते म्हणाले की, दुपारी १२ .३० वाजता प्राणप्रतिष्ठा करण्याचा मुहूर्त आहे . त्याच्याआधी होणारी पूजा विधी आता सुरू करण्यात आली आहे . उद्या सकाळी रामलल्ला गाभाऱ्यात येतील . तेव्हा अनेक विधी पार पडतील . विविध नद्यांमधून आणलेल्या जलाने ( पाण्याने ) मूर्तीचा जलाभिषेक होईल . २२ जानेवारी रोजी दुपारी साडे बाराच्या मुहूर्तावर प्राणप्रतिष्ठा केली जाईल . प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावर कदाचित काही लोक प्रश्नचिन्ह उपस्थित करतील . तो त्यांचा मुद्दा असू शकतो . पण मंदिरातील मूर्तीमध्ये शक्तीचा संचार होणे आवश्यक आहे .

## वाढत्या मोबाइलच्या वापराने हिरावली गावातील चावडी

### गप्पांचे फड झाले दुर्मिळ : सोशल मीडियाचे युग तरुणांचे आकर्षण

आधुनिक केसरी न्यूज

मनोज जाधव


खामगाव : ग्रामीण संस्कृतीत गावातील वड, पिंपळाच्या झाडाखालचा पार व चावडी ही तत्कालीन मनोरंजन, जनसंपर्क आणि समाजप्रबोधनाचे जणू विद्यापीठच होते. परंतु आता त्यावर सोशल मीडियाने अतिक्रमण केले असून प्रत्येकजण आता व्हॉट्सअॅप, फेसबुक तसेच ऑनलाइन गेम खेळण्यात व्यस्त असल्याने ही सार्वजनिक ठिकाणे ओस पडल्याचे चित्र गावागावांत दिसून येत आहे. गावच्या चावडीवर रोज सकाळ-संध्याकाळ हजेरी लावल्याबिगर गावातील लोकांना राहवत नसे, कारण राजकारणातील गप्पांचा फड, एखाद्याची टिंगलटवाळी, यात्रा-जत्रातील तमाशाच्या गप्पा, पीकपाण्याविषयी आचारविचार असे एक ना अनेक गप्पांचे फड चावडीवर रात्र-रात्र रंगायचे! मात्र सध्याच्या सोशल मिडियाच्या युगात चावडी संस्कृतीला घरघर लागल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सोशल मीडियाच्या उदयानं तर सर्वांच्या जगण्याचे आयामच बदलले. एका क्षणात



मानवी जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या सोशल मीडियामुळे मानवाचं आयुष्यच बदलून गेले आहे. व्हॉट्सअॅप, फेसबुकमुळे गावाच्या सतत संपर्कात आली. त्यावरुन सकाळ-संध्याकाळ संवाद साधला जाऊ लागला. त्यामुळे गावातील चावडी व पार ओस पडू लागले तर व्हॉट्सअॅप ग्रुपवरील मेसेजचे ढिगारे वाढू लागले. ग्राम संस्कृतीतील चावडीची जागा आता सोशल मीडियाने घेतली आहे.

ग्रामीण भागातील गावचा पार, चावडी, न्हाव्याची दुकाने अशी काही मोक्याची ठिकाणे गावातील खबरबातीची उत्तम आणि प्रभावी ठिकाणे होती. या शिवाय गावातील कोणाचे पानही हलायचे नाही. एखादी बातमी पारावरून सुटली की, ती वाऱ्यासारखी गावभर पसरायची. तिथे कुठलाच विषय वर्ज्य नसायचा. मात्र, सध्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाने झालेल्या बदलामुळे सोशल मीडिया खेडोपाडी पोहोचला आहे. संगणक व स्मार्टफोनच्या आगमनाने गावातील पार, चावड्या व इतर सामूहिक चर्चेची ठिकाणे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. पूर्वी गावात प्रवेश केला की एखाद्या भल्या मोठ्या वडाच्या किंवा पिंपळाच्या झाडाभोवती दगडाच्या सुबक बांधकाम केलेल्या पारावर गावातील ज्येष्ठ मंडळी गप्पा मारताना दिसायची. मात्र, विकासकामांच्या बांधकामासाठी तसेच रस्ते बांधताना मोठ मोठे वड, पिंपळाची झाडे जमीनदोस्त झाली आहेत. रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करून रस्ते व्यापक बनवले पण, ज्येष्ठांच्या गप्पांचा फड रंगणारी ठिकाणे असणारे पार व चावड्या ओस पडू लागल्या आहेत. आता व्हॉट्सअॅप ग्रुपवर गावातील समस्या व अडचणींवर चर्चा होते. गावातील महत्त्वाच्या गोष्टींची माहिती या ग्रुपद्वारे अगदी गावाबाहेर असणाऱ्या ग्रामस्थांनाही सतत कळत राहते. जुन्या काळी ग्रामसंवादाचे ठिकाण चावडी ही ग्रामीण संस्कृतीची ओळख दिमाखात सांगितली जात होती. मात्र सध्याच्या डिजीटल युगात सारंकाही ऑनलाईन होताना दिसत आहे. परिणामी ग्रामसंस्कृतील चावड्या नष्ट होत चालल्या आहेत. खेड्यातल्या माणसांचे आयुष्य या चावड्यांनी व्यापून टाकले होते. हे वैभव आता विस्मरणात जात आहे. येणाऱ्या नव्या पिढीला चावडी हा प्रकार कदाचित चित्र काढूनच दाखवावा लागतो की काय! असे जुने जाणकार भीती व्यक्त करीत आहेत.

**आता व्हॉट्सअॅपवर होतात सोशल वॉर :** गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून मोबाइलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला . आता तर प्रत्येकाच्या हातात मोबाइल आला . गावातील ग्रामसभा असो किंवा कोणताही सुचना व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून क्षणात इतर लोकांपर्यंत पोहोचतात . गावोगावी ग्रामविकास प्रतिष्ठान किंवा ग्रामविकास मंच नावाचे व्हॉट्सअॅप ग्रुप गावोगावी तयार झाले आहेत . बऱ्याच वेळा काही मुद्यावरून तू-तू-मैं-मैं होत सोशल मीडियावर सोशल वॉरही होताना दिसत आहे .




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# ते चाळीस दिवस...

त्या मुलांना सुरक्षित ठिकाणी घेऊन जाण्यासाठी निघालेली ती माता मात्र गंभीर जखमी झाली होती. तिची वाचण्याची कोणतीही शक्यता दिसत नव्हती. पण अशाही परिस्थितीत या मातेने चार दिवस मृत्यूशी झुंज दिली. पण कोणतीही मदत वा वैद्यकीय उपचार मिळू न शकल्याने तिने या जगाचा निरोप घेतला. तिचा जीव अडकला होता तिच्या पिलांमध्ये. जाता जाता त्यांना कसं जगायचं हे ती सांगून गेली. मला इथेच सोडून द्या आणि तुम्ही सुरक्षित जागी पोहचण्याचा प्रयत्न करा. स्वतःचा जीव वाचवा. या चार छोट्या मुलांमध्ये होती लेस्ली नावाची एक तेरा वर्षांची मुलगी. तिच्यासोबत होती तिची तीन लहान भावंडं. सोलेनी वय वर्ष नऊ, टिएन वय वर्षे फक्त चार आणि लहानगी क्रिस्टीन. क्रिस्टीन तर अगदीच कोवळी. जेमतेम एक वर्षाची. अपघातातून बचावले तरी जिवंत राहणे या मुलांसाठी सोपं नव्हतं. नियती जणू त्यांची कठोर परीक्षा घेत होती. अमेझॉनच्या जंगलाचं नुसतं नाव जरी काढलं तरी भल्याभल्यांचा थरकाप होतो एवढं हे भयानक जंगल. या जंगलात दिवसाही सूर्यप्रकाश सगळीकडे पोहोचू शकत नाही एवढं ते घनदाट आणि उंच. जंगलामध्ये हिंस्त्र प्राण्यांचा सुळसुळाट. डास, विषारी कीटक, साप यांचा वावर. जवळपास कोणतीही मानवी वस्ती नाही. मदत मिळण्याची शक्यता नाही. भरीत भर म्हणजे हे जंगल तस्करांचा आणि दहशतवाद्यांचा अड्डा. अशा या जंगलात ही कोवळी पोरं आपल्या आयुष्याशी झुंजत होती. अपघात घडल्याचे कळल्यानंतर कोलंबियामध्ये एकच हलकल्लोळ उडाला. कोलंबिया सरकारने विमानाचा शोध घेण्याची मोहीम युद्धपातळीवर सुरु केली. तेथील पोलीस दल, सैन्यदल आणि बचाव पथकाची माणसं या विमानातील माणसं, मुलं कुठे आढळताहेत का याचा नियोजितपणे शोध घेऊ लागले. शोधकार्यात अमेझॉनच्या घनदाट जंगलामुळे अनेक अडथळे येत होते. पण नेटाने शोध घेणे सुरूच होते. **क्रमशः**





## आनंदी पहाट

# अधिकाराचा व अधिकाऱ्यांचा गैरवापर अयोग्य

आधुनिक केसरी

नैसर्गिकरीत्या मिळालेल्या अधिकाराचा वापर करणं हे जितकं स्वाभाविक असतं तितकंच त्या अधिकारांची कर्तव्य म्हणून जाणीव होणं देखील जरुरीचं असतं. अनेकदा कर्तव्यदक्ष म्हणवणारी व्यक्तीच प्राप्त अधिकाराचं महत्व समजू शकत नाही आणि त्याचा वापर करत नाही तेव्हा त्या व्यक्तीमधील उणिवांचं दर्शन होऊ लागतं. काहीवेळा नसलेल्या अधिकारांचा वापर करणारे देखील सामाजिकदृष्ट्या उपद्रवी ठरत असतात. अशा व्यक्तींचं वर्तन आणि व्यवहार ह्या दोन्हीमधून व्यभिचार दिसायला लागतो. त्यामुळे अशाबाबतीत आपण सावध झालो नाहीत तर त्यांचं सावज होऊ लागतो. ह्याची जाणीव सतत ठेवणं जरुरीचं असतं. अशा व्यक्ती अधिकाराचा उपयोग त्यांच्या फायद्यासाठी, स्वार्थासाठी, व्यापारासाठी करायला लागत असल्याचं दिसून येतं. तेही नसलेल्या अधिकाराचा नुसता वापर न करता ते व्यापार करू लागतात, ही बाब अधिक खेदाची आहे. एखाद्या व्यक्तीनं असलेल्या अधिकाराचा देखील वापर मर्यादेत राहून केला तरच योग्य ठरतं. गतकाळातील घटना, अनुभव सहजपणे विसरणं शक्य नसतं; हे जरी कितीही खरं असलं, तरीही त्यांमध्ये मनानं गुरफटून राहणं देखील तापदायक ठरू शकतं, हे विसरून चालणार नाही. काहीवेळा काही बाबतीत आपल्या पूर्वानुभवाचा उपयोग निश्चितच आपल्याला होतो, पण तसं नेहमीच अपेक्षेप्रमाणे घडतं असं नाही. हे जाणून घेण्याचा आपल्या मनांत विचारही अनेकदा येत नाही. आपल्या आयुष्यातील अनेक आठवणी आपल्याला नवी उमेद देऊ शकतात, नवा विचार देऊ शकतात, अनुभवांतील काही चुकांमुळे नवनवीन मार्ग देऊ शकतात, हे निश्चितच खरं आहे. पण म्हणून त्यांत आपण कितपत समरस, रममाण व्हायचं ह्याचीही आपल्याला जाणीव होण्याची गरज असते. आपल्या उत्कर्षासाठी, प्रगतीसाठी आवश्यक बदल स्वतःच्या विचार, वर्तन आणि व्यवहारामध्ये करत राहणं जरुरीचं असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## एकरूप झाला | मौना संगे ||

सापडली वाट | आनंदाची आता ||
गावली रे माता | अनाथास ||१||
माऊलीची ओवी | वाटते अंगाई ||
आत्ममग्न होई | मौन निद्रा ||
ज्ञानाच्या मंदिरी | आत्म्याचे भजन ||
कर्माचे पुजन | पुण्य फळ ||३||
राम कृष्ण हरी | मंत्र आत्माराम ||
सांगे तुकाराम अभंगात ||४||
ज्ञानयोगी माझी | विश्वाची माऊली ||
कैवल्य सावली | शांतीरूप ||५||
सुख-दुःख आता | भेद न उरला ||
एकरूप झाला | मौना संगे ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

पुन्हां विदेशासी गेला ।द्रव्य मेळऊन आला ।
तव घरीं कळहो लागला ।सावत्र पुत्रांसी ॥१४॥
स्त्री जाली न्हातीधुती ।पुत्र देखों न सकती ।
भ्रताराची गेली शक्ती ।वृद्ध जाला ॥१५॥
सदा भांडण पुत्रांचें ।कोणी नायकती कोणाचें ।
वनिता अति प्रीतीचें ।प्रीतिपात्र ॥१६॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

हानि लाभ सुख दुखन में, ह
र्ष शोक नहिं सन्त ।
चिन्ता चाह न मन करें, अभय अशंक
अनन्त ।।४१ ।।(स्वर्वेद प्रथम मण्डल
अष्टम अध्याय) ०१/०८/४१
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
कुठाल्याही वस्तूच्या हानी-लाभात सुख-दुःख आणि हर्ष-शोक संतांना होत नाही. संत ना कुठल्या वस्तूची इच्छा करतात, ना चिंता, विचार करतात. ते निर्भय आणि निःसंकोच होऊन अनंत महाप्रभूच्या भक्तीत रात्रंदिवस निमग्न असतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ६१वे


दिवस दुसरा उजाडला । रामनाम घेत
गीतामाईंनी प्राण सोडला । शांतपणे देह ठेवला।
श्री महाराजांच्या मांडीवरी ।।१ ।।
आई तू गेलीस "!,शब्द आले तोंडून । धैर्य
पडले गळून ।
गतप्राण कुडी मांडीवरी घेऊन ।
महाराज राहिले बसून ।।२।।
गीतामाई गेल्या"! वृत्त पसरले । नाव त्यांचे
माहिती झालेले।
दान त्यांनी बहुत केलेले ।
अयोध्येमध्ये ।। ३ ।।
अंत्यदर्शनासाठी जनता आली ।
गर्दी अलोट जमली ।
पुष्पमाला, तुळशी माळ घातली ।
भजन म्हणती सारे ।।४।।
अयोध्येतील बैरागी, संन्यासी आले ।
नामगजर करू लागले। महाराज घेउनी गेले ।
अंत्यसंस्कारसाठी ।।५ ।।
उत्तरक्रियेस आरंभ झाला।
नाम सप्ताह सुरू झाला ।
महाराजांनी अन्नदान, दानधर्म सुरू केला।
आईस आवडे म्हणूनी ।। ६ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# साधन - चतुष्टय

आधुनिक केसरी



कोणतीही इमारत बांधीत असताना अगोदर तिचा पाया जसा घालावा लागतो, त्याप्रमाणे परमार्थ साधण्यासाठी अगोदर साधनांचा पाया घालावा लागतो. शास्त्राने चार प्रकारचे साधन सांगितले आहे. प्रथम, नित्यानित्यवस्तुविवेक करावा. अनित्य जो विषय त्याच्या बाबतीत आपण उदास व्हावे आणि नित्य जो भगवंत त्याच्याकडे लक्ष द्यावे. नंतर, या जगातल्या किंवा स्वर्गातल्या भोगाची वासना नाहीशी करावी. हे दुसरे साधन होय. आपले मन बाह्य विषयांकडे धाव घेते; तिथून त्याला खेचून आणावे आणि भगवंताकडे लावावे. आपण चूक केली नसतानाही कोणी जाच केला तरी शांतपणे सहन करावे, गुरूच्या सांगण्यावर विश्वास ठेवावा, हर्षविषाद न मानता संतोषाने राहावे; हे तिसरे साधन होय. शेवटी, भगवंताच्या भेटीची किंवा सद्गुरूंच्या भेटीची खरी तळमळ लागावी. ही सर्व साधनसामग्री असेल तरच साधकाला ब्रह्मदर्शन घडेल. ब्रह्मदर्शन होण्यासाठी कडकडीत वैराग्य असावे लागते. पैशाचा लोभ पूर्णपणे गेला पाहिजे. मनामधली कामवासना पूर्णपणे गेली पाहिजे. मोहाला बळी पडता कामा नये. नुसता प्रपंच चांगला करणे हे काही मनुष्यजन्माचे ध्येय नव्हे. जनावरेदेखील आपापला प्रपंच करतातच. मनुष्याने भगवंताची उपासना करून त्याची प्राप्ती करून घेतली पाहिजे, तरच प्रपंचातल्या कष्टांचे सार्थक होते. सध्याच्या परिस्थितीमध्ये उपासना करायला नामासारखा सोपा उपाय नाही. खरोखर, भगवंताच्या नामामध्ये फार मोठे सामर्थ्य साठविलेले आहे. त्याचे नाम घेऊन जो जगात वावरेल, त्याला व्यवहारामध्ये नेहमीच यश येईल असे नाही, परंतु भगवंत त्याची लाज राखील यात शंका नाही. प्रपंचातले यश आणि अपयश या तात्पुरत्या गोष्टी आहेत. भगवंताच्या अनुसंधानाला खरे महत्त्व आहे. रामाच्या इच्छेनेच आपल्याला सुखदुःख भोगावे लागते, पण हे आपल्याला सर्वांच्या शेवटी आठवते, म्हणून सुखदुःख बाधते. म्हणून, आपण सुरुवातीपासूनच रामाची इच्छा लक्षात ठेवून वागू. यासाठी त्याच्या नामाची गरज आहे. प्रपंचाची तऱ्हा अशी असते की, आज सुख झाले म्हणून जरा बरे वाटले, की लगेच उद्या दुःखाचे ताट पुढे वाढून ठेवलेले असते. म्हणून, एका डोळ्यात सुखाचे अश्रू, तर दुसऱ्या डोळ्यात दुःखाचे अश्रू ठेवून माणसाने प्रपंचात वागावे. प्रत्येक गोष्ट भगवंताच्या इच्छेनेच जर घडते, तर एकीचे सुख आणि दुसरीचे दुःख का मानावे ? शहाण्या माणसाने आपले चित्त भगवंताच्या नामात गुंतवून ठेवावे, आणि बरावाईट जसा प्रसंग येईल त्यात सामील होऊन जावे. जो नाम घेईल त्याच्या मागे राम उभा आहे. नाम घेणाऱ्याचे राम कल्याण करतो, एवढे माझे सांगणे शेवटपर्यंत विसरू नका.
**२०८. अती प्रेमाने नाम घ्यावे. नामात तल्लीन झाल्यावर देहाची सुखदुःखे बाधणार नाहीत.**

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

तरी तुमची मी मागे मार्गांत टाकून दिलेली सोन्याची वीट आणून देतो, ती घेऊन समारंभ साजरा करावा. यावर मच्छिंद्रनाथाने त्याचे समाधान केले कीं, बाळा तुझ्यासारखा शिष्य असल्यावर मला यःकश्चित् सोन्याची वीट घेऊन काय करावयाची आहे ? मग गोरक्ष म्हणाला, सर्व यथासांग होईल; पण हा सर्व आपल्या कृपेचा प्रताप, मजकडे काही नाही.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, १८ जानेवारी २०२४
adhunikkesari.com Adhunik Kesari

# सदगुरू गंगागिरी महाराजांच्या शक्तीनेच सप्ताह

## महंत रामगिरी महाराज : श्रीक्षेत्र पंचाळे येथे १७७वा हरिनाम सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** सदगुरू गंगागिरी महाराजांचा १७७ वा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन सिन्नर तालुक्यातील पंचाळे येथे होणार असल्याचे निश्चित झाले आहे. पंचाळे व पंचक्रोशीतील भाविकांनी सप्ताह मिळावा यासाठी अनेक वर्षांपासून मागणी लावून धरली होती. सिन्नर तालक्यातील हजारोंच्या संख्येने ग्रामस्थ व भाविकांनी सप्ताहाच्या मागणीसाठी श्री क्षेत्र सरला बेट येथे महंत रामगिरिजी महाराजांची भेट घेतली  असता तयारीला लागा असे सूचक वक्तव्य त्यांनी करताच सर्वांनीच हरिनामाचा गजर करत आनंद व्यक्त केला. महंत रामगिरिजी महाराज मार्गदर्शन करताना म्हणाले की, सदगुरू गंगागिरी महाराजांची ईच्छा असेल तेथेच सप्ताह होत असतो. योग घडून यावा लागतो. तेच सर्व आपल्याकडून करून घेतात.ते त्यागी संत होते. संत निवृत्तीनाथ महाराजांची  समाधी ही त्यांनीच



**आमचा बारा वर्षाचा वनवास संपवावा :** कोणतीही अडचण सप्ताहाला येऊ देणार नाही . जेथे कमी तेथे आम्ही उभे राहु . आपल्या आदेशाप्रमाणेच नियोजन करण्यात येईल . – **माजी आमदार राजाभाऊ वाजे .**
आमच्या तालुक्यात मोठ्या संस्था नाहीत परंतु सिन्नर तालुक्यातील लोक जिद्दी आणि धार्मिक आहेत .आर्थिक व शारीरिक कोणतेही बळ कमी पडू देणार नाही . – **सिमिंतीनी कोकाटे, मा .जि .प . सदस्य, नासिक .**

शोधलेली आहे. सन १८९५ मध्ये गंगागिरी महाराज यांनी पंढरपूर येथे मोठा सप्ताह केला.सुमारे ७०० पोते साखरेचे लाडूचां प्रसाद वाटप केला होता. वारकरी संप्रदायात फार मोठे कार्य त्यांनी केले आहे. आज सप्ताहाचे स्वरूप अधिक मोठे होत आहे. नियोजनही मोठ्या प्रमाणावर करावे लागते त्यामुळे सप्ताहाच्या तयारीला लागावे परंतु नारळ मात्र परंपरेनुसार पुणतांबा येथेच दिला जाईल असे सूचक वक्तव्य मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांनी यावेळी केले.

सप्ताह मागणीसाठी माजी आमदार राजाभाऊ वाजे, जिल्हा परिषद सदस्य कु .सिमिंतीनी कोकाटे, मा.पंचायत समिती सदस्य विजय गडाख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशव कोकाटे, सरपंच संभाजी जाधव, मच्छिंद्र चिने, भारत कोकाटे, मा.बांधकाम सभापती राजेंद्र चव्हणके,  संचालक अरुण येवले, विठ्ठलराव आसने, शिवाजी म.भालुरकर,शिवाजी म.ठाकरे, सुभाष म.गेठे, किशोर म.खरात, किसन म.काकड, रेखाताई म.काकड, नागेश म.गोरडे, महेश म. भगुरे, रामभाऊ चव्हाणके, संतोष चव्हाणके, माजी जिल्हा परिषद सदस्य दीपक खुळे, नवनाथ मुरडनर, नवनाथ गडाख, कुष्णा घुमरे, शरद थोरात, सरपंच निवृत्ती सापनर, दत्तात्रय पवार, परशुराम कथले, केदूनाना पवार, अरुण वाघ, विनायक तांबे, वाल्मीक म.हांडोरे, राजेंद्र डुंबरे, फकीरा बोरनारे, सुनील काजळे, शिवाजी उंडे, पावडे महाराज, संपत वाणी, गोरख म.कासार आदींसह पंचाळे पंचक्रोशीतील  ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# 'श्रीराम रंगी रंगले' उत्सवात होणार जल्लोष स्वप्नपूर्तीचा

## विश्व हिंदू परिषद, संस्कार भारती यांच्यातर्फे संयोजन; प्रभू श्रीरामाची १०० फूट भव्य रांगोळी साकारली जाणार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** प्रभू श्रीरामाची १०० फूट भव्य रांगोळी, रामचरित्रावर अखंड गायन-भजन- नृत्य  सादरीकरण, श्री रामायणावरील १२५ चित्रांचे प्रदर्शन, श्रीराम खिचडी प्रसाद वाटप, प्राचीन शस्त्र आणि श्रीराम मंदिर प्रतिकृती-पुस्तके-गौ साहित्याचे प्रदर्शन अशा नानाविध कार्यक्रमांनी 'श्रीराम रंगी रंगले' उत्सवात स्वप्नपूर्तीचा जल्लोष होणार आहे. दिनांक २० व २१ जानेवारी रोजी सकाळी १० ते रात्री १० यावेळेत नारायण पेठेतील रमणबाग प्रशालेत या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आयोजक व पूर्व संघ प्रचारक व भाजप नेते सुनील देवधर यांनी पत्रकार परिषदेत दिली.  पत्रकार परिषदेला विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत प्रचार प्रसार प्रमुख तुषार कुलकर्णी, संस्कार भारतीचे प्रांत सहमंत्री सतीश कुलकर्णी, रांगोळी संयोजक अभय दाते, श्री रामराज्य फाउंडेशनचे संस्थापक



आशिष काटे आदी उपस्थित होते. तुषार कुलकर्णी म्हणाले, विश्व हिंदू परिषद आणि संस्कार भारती पुणे महानगर यांनी उत्सवाचे संयोजन केले आहे. श्रीराम मंदिर, अयोध्या येथे होता असलेल्या श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठेचा आनंद साजरा करण्यासाठी हा उत्सव पुण्यात भव्य स्वरूपात होणार आहे. प्रभू श्रीरामाची ७००० स्क्वेअर फूट भव्य रांगोळी संस्कार भारती व श्रीरंग कलादर्पणचे कलाकार ७ हजार चौरस फूट आकारात साकारणार आहेत. यामध्ये रामायणातील ७ प्रसंग रेखाटण्यात येणार असून त्याकरिता २५० किलो रंग व रांगोळी लागणार आहे आणि ही भव्य रांगोळी साकारण्यासाठी ४० तासांचा कालावधी लागणार आहे. सतीश कुलकर्णी म्हणाले, आर्ट इंडिया फाऊंडेशनतर्फे श्री रामायणावर आधारित १२५ चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये जगभरातून काढलेल्या २ हजार चित्रांमधील  १२५ सर्वोकृष्ट चित्रे प्रदर्शनात ठेवण्यात येणार आहेत. शंभूराजे मर्दानी खेळ विकास मंचातर्फे प्राचीन ७०० शस्त्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. तसेच रामचरित्रावर अखंड गायन-भजन- नृत्य सादरीकरण दिग्गज कलाकार करणार आहेत. दोन दिवसीय उत्सवात येणाऱ्या प्रत्येक रामभक्ताला श्रीराम खिचडी प्रसादाचे वाटप केटरिंग असोसिएशन च्या वतीने होणार आहे. उत्सवात प्रवेश विनामूल्य असून रामभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# कोणत्याही प्रसंगाचे लेखणीतून विश्लेषण करणारा पत्रकार रूपेश बाजड

आधुनिक केसरी

सामाजिक, राजकीय, धार्मिक,मैत्री आणि पत्रकारिता क्षेत्रात आपलं विशेष कौशल्य दाखवत सर्वांच्याच मनावर आपुलकीचं आणि हक्काचं आधिरज्य निर्माण करणारा पत्रकारितेतील " कोहिनूर हिरा " म्हणून ज्याची ख्याती आहे.असा आमचा सर्वांचा लाडका पत्रकार रूपेश पाटील बाजड याचा आज वाढदिवस त्यानिमित्त त्याला शूभेच्छा देण्यासाठी केलेला हा छोटासा लेखप्रपंच.



वसंत खडसे
9373578429

रिसोड तालुक्यातील नावली या गावातील एका शेतकरी कुटुंबात जन्मलेला रूपेश जन्मतःच कुशाग्र बुध्दी घेउन जन्माला आला असे म्हटले तर वावगे ठरू नये..! कारण घरचा वारसा हा निव्वळ सांप्रदायिक पंथाचा, पणजोबा पासून वडीला पर्यंत घरातील सर्वच पंढरपुरच्या विठुरायाचे निरंतर वारकरी. त्यामुळे सहाजिकच रूपेशला सुद्धा वारकरी पंथाची रुची निर्माण झाली. मात्र या पंथाच्या वाटेवरून चालताना त्याच्या विचारावर संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. आणि खऱ्या अर्थाने येथूनच त्याची बहुजन विचारसरणीची सामाजिक संघटना असलेली ब्रिगेडशी नाळ जोडली रूपेश याच संघटनेचा अध्यक्ष म्हणून जबाबदारीने काम आहे. पत्रकारितेतील प्राप्त केल्यानंतर सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी त्याने व्यवसाय नव्हे; तर बांधिलकी म्हणून नवी कारकीर्द सुरू पदार्पणातच एक म्हणून रूपेशने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. सर्व धर्म समभाव व्यक्तिमत्त्व असल्याने आणि सामाजिक जाण असलेला आमचा हा लाडका पत्रकार महापुरुषांचे विचार आपल्या लेखणीतून उत्कृष्ट मांडणी करुन मुद्देसूद मांडतो.

ग्रामीण भागाशी नाळ जुळलेली असल्याने सामाजिक प्रश्नावर आवाज उठवून त्याने स्वकर्तृत्व सिध्द केले आहे. सोबतच एक औषध विक्रेता म्हणून वारकरी मेडीकलच्या माध्यमातून तो एक मनमिळावू व्यावसायिक म्हणुन केवळ रिसोड शहरातच नव्हे; तर तालुक्यात नावारूपास आलेला प्रतिष्ठित व्यापारी पण आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे, शेतकऱ्यांचे, विद्यार्थ्यांचे प्रश्न मांडणारा निर्भीड, निस्वार्थी व प्रामाणिक व्यक्तिमत्त्व म्हणुन मी त्याच्याकडे पाहतो. त्याचं अचूक लेखन एका मिनिटात कोणत्याही प्रसंगाचे विश्लेषण करून आपल्या लेखणीतून आवाज उठवण्याची क्षमता रुपेशमधे आहे असं मला वाटतं..! लेखणीतून मोठ्या प्रश्नांना वाचा फोडणारी लेखणी त्याच्याकडे आहे. त्यामुळे भविष्यात अनेक गंभीर प्रश्नावर तो प्रकाश टाकू शकतो याचा आम्हा सर्व मित्रमंडळीला सार्थ अभिमान वाटतो. वर्तमानपत्र, शिक्षण, उद्योग, शेती, सामाजिक कार्य, आणि सामाजिक संघटना अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्यामुळे रुपेश पाटील बाजड यांनी वाशिम जिल्ह्यात स्वतःची एक ओळख निर्माण केली आहे. ***असा आपलासा वाटणारा आमचा आज वाढदिवस त्यानिमित्त भावी आयुष्यासाठी आधुनिक केसरीकडून हार्दिक शुभेच्छा..!***





## शिंदेंचा खुलासा

आधुनिक केसरी

मला भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्यासाठी मोठ्या माणसाने ऑफर दिली होती. तो कोण माणूस आहे हे मी सांगणार नाही. तसे नाव घेऊही नये. पण मी काँग्रेसी विचारांचा व्यक्ती आहे. काँग्रेस पक्ष सोडून कुठेही जाणार नाही, असे स्पष्टीकरण ज्येष्ठ काँग्रेस नेते, माजी केंद्रीय मंत्री तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोलापूर दौऱ्यावेळी शिंदे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा रंगल्या होत्या. या चर्चांवरच शिंदे यांनी आज सोलापुरात माध्यमांशी संवाद साधला.लोकसभा निवडणुकीत दोनदा पराभूत होऊनही मला भारतीय जनता पक्षाची ऑफर दिली. मला आणि प्रणिती शिंदेंना भाजपची ऑफर आहे. ते ही मोठ्या माणसाने मला पक्षप्रवेशाची ऑफर दिलीये, असा गौप्यस्फोट सुशीलकुमार शिंदे यांनी अक्कलकोट एका कार्यक्रमात बोलताना केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी सौलापूर दौऱ्यावर येत आहेत. त्याआधी सुशीलकुमार शिंदे यांनी गौप्यस्फोट केल्याने राज्याच्या राजकारणात भूकंप घडणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला होता. मात्र या सगळ्या चर्चांचे सरतेशेवटी शिंदे यांनी खंडन केले आहे. लोकसभा निवडणूक २०१९ आणि आता येऊ घातलेली २०२४ ची निवडणूक दोन्ही वेळी तुम्हाला भाजप प्रवेशाची ऑफर आलेली आहे, भाजपला नेमके काय करायचे आहे, काँग्रेस पक्ष फोडायचा आहे? असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यावर सुशीलकुमार शिंदे म्हणाले, "भाजपला नेमके काय करायचंय हे मला माहिती नाही, त्यांना जे काय करायचंय ते त्यांना करू दे.. मला जे काही करायचंय ते मी करेन.. मिलिंद देवरा यांनी काही दिवसांपूर्वी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. काँग्रेस पक्षात जे तरुण आश्वासक नेते आहेत, जे दीर्घकाळ नेतृत्व करू शकतात, त्यांच्यावर भाजपची नजर आहे का? प्रणिती यांना त्याच दृष्टीकोनातून भाजपने ऑफर दिली आहे का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यावर शिंदे म्हणाले, मी जसे काँग्रेस सोडण्याच्या चर्चांचे स्पष्टपणे खंडन केले, तसेच स्पष्टीकरण प्रणितीने देखील दिले आहे. आणखी आम्ही काय सांगू... असं म्हणत कोणत्याही परिस्थितीत काँग्रेस पक्ष सोडणार नाही, हेच शिंदे यांनी सांगितले.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

## लोकशाहीमध्ये लोकांची किंमत काय ?

आधुनिक केसरी

**भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. भारतीय संविधान जगातील सर्वोत्कृष्ट लिखित संविधान असून भारताच्या प्रत्येक नागरिकांना समान हक्क अधिकार, संधी, व संसाधन उपलब्ध करून दिले आहे. लोकशाही मध्ये लोकांचे स्थान काय या प्रश्नाचे उत्तर शोधायचे तर संविधान वाचावे लागते. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संविधान वाचायचे तर डोक्यात मेंदू पाहिजे, तो जागृत पाहिजे, मानवता पाहिजे, समतेचा विचार पाहिजे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे राष्ट्र हीत डोक्यात पाहिजे.**

तरच संविधान वाचण्या लायक व्यक्ती होत असते. संविधान वाचताना व समजून घेताना लक्षात येते की भारतीय संविधानाने एक भारतीय म्हणून किती मोठी ताकत प्रत्येक भारतीय नागरिकांना बहाल केली आहे. संविधानाने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारून लोककल्याणावर भर दिला आहे. संविधानातील प्रत्येक शब्द खुप महत्वाचा असुन विचार करायला लावणारा आहे. संविधानाने कोणताही घटक कल्याणापासुन दुर्लक्षित होणार नाही याची खबरदारी संविधानाच्या माध्यमातून संविधानाचे एकमेव शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली आहे. प्रत्येक नागरिकांना समान अधिकार, समान स्थान व समान संधी उपलब्ध करून दिल्याने श्रीमंत विरुद्ध गरीब यामधील भेदच कमी करून गरिब आणि श्रीमंत यांना एका लाईन मध्ये बसवले. हजारो वर्षांपासून विषमतेच्या नावाखाली माणसाला माणसापासून दुर ठेऊन मानसाच्या सावलीचा, वाणीचा व स्पर्शांचा विटाळ येथील काही बुद्धीहीन व विकृत लोकांना होत होता. तो विटाळ दुर करून जात धर्म न बघता एक भारतीय माणूस म्हणून सर्व जन सारख्याच प्रमाणात राष्ट्रीय संपती व नैसर्गिक संपतीचा उपभोग घेऊ शकतात. देशाच्या सत्तेत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी होण्याचा, सत्ताधारी लोकांवर नियंत्रण ठेवून लोककल्याणकारी कामे करून घेण्याचाही अधिकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक भारतीयांना दिला आहे. सत्तेत जनप्रतिनिधी कोण असावे याचा संपूर्ण अधिकार मताधिकाराच्या माध्यमातून प्रत्येकाच्या मनगटात दिलेला आहे. आणि मताधिकार हा पुर्ण पणे वैयक्तिक अधिकार आहे. निवडणूक प्रक्रिया हि पारदर्शक, निष्पक्ष व निडर असायला पाहिजे जेने करून प्रत्येक नागरिकांना मताधिकार बजावताना स्वतः च्या मतावर स्वाभिमान निर्माण झाला पाहिजे. गरीब व सामाजिक दृष्टीने मागास असलेल्या समुहाचे कल्याण करण्यासाठी सरकार ला नियोजन करावे लागते. कोणत्याही प्रकारचा भेद न करता प्रत्येक योजनेचा लाभ नागरिकांना द्यावा लागतो. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका व प्रसारमाध्यमे हे भारताच्या प्रत्येक नागरिकांच्या कल्याणासाठी काम करण्यासाठी निर्माण केलेले आहे. निवडणूकीच्या माध्यमातून निवडून येऊन लोकप्रतिनिधी नी स्वतः ची घरे न भरता आपल्या मतदार संघात जाऊन जनतेच्या समस्या सोडवायला पाहिजे. यासाठी लोकप्रतिनिधींना मानधन, प्रवासखर्च, मोबाईल खर्च, कार्यालय खर्च सर्व काही मिळते म्हणजे निवडून दिलेला प्रतिनिधी आपल्या मतदार संघाचा राजा नाही तर लोकांचा सेवक असतो आणी त्याचा मोबदला त्यांना मिळत असतो. कार्यकारी मंडळ अर्थात सर्व प्रशासकीय यंत्रणा ग्रामपंचायत सचिवा पासुन तर मंत्रालयीन सचिवापर्यंत सर्व नोकरदार वर्ग हा जनतेची सेवा करण्यासाठी असतो. शासकीय योजना व लाभ जनते पर्यंत पोहचवुन लोककल्याण याच लोकांद्वारे केले जाते. एक विचार करा एक भारतीय नागरिक म्हणून नागरिकांच्या हितासाठी त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी ग्रामपंचायत सरपंचापासुन तर देशाच्या प्रधानमंत्री पर्यंत आणि ग्रामपंचायत सचिवापासून तर मंत्रालय सचिवापर्यंत सर्व काही नागरिकांच्या कामासाठी आहेत.



म्हणजे एवढा मोठा थाट फक्त नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आहे. सोबतच कुठे अन्याय अत्याचार झालाच तर न्यायासाठी राजकीय व सरकारी हस्तक्षेप नसलेले स्वतंत्र असे न्यायालय आहे. राजेशाही मध्ये राजा स्वतः च्या कल्याणासाठी व संरक्षणासाठी वेगवेगळ्या लोकांची नेमणूक करून स्वतः चे वर्चस्व प्रस्थापित करत होते. लोकशाही मध्ये सर्व यंत्रणा नागरिकांच्या कल्याणासाठी व संरक्षणासाठी असल्याने लोकशाही मधील खरा राजा हा जनताच आहे. लोकशाही ने सर्वसामान्य मानसाला राजाचा दर्जा व सन्मान निर्माण करून दिला आहे. परिस्थिती नुसार लोककल्याणासाठी एखादा कायदा निर्माण जरी करायचा तरी तो कायदा निर्माण करण्याचा अधिकार कायदेमंडळाला संविधानाने दिला आहे. परंतु लोकांनी संविधान वाचले नाही समजून घेतले नाही. म्हणून लोकांना स्वतः चे अस्तित्व व स्वतः ची किंमत समजली नाही. लोकशाही मध्ये स्वतः चे घरे भरता यावी म्हणून ज्यांनी सत्ता हाती घेतली त्यांनी लोकशाहीची मुळे सर्वसामान्य लोकांपर्यंत जाऊच दिली नाही. लोकांना संविधान, हक्क अधिकार, राष्ट्रवाद या विषयी जागृत करण्या ऐवजी लोकशाही चा उल्लेख केवळ निवडणूक पुरता करून मताची पेटी भरून घेण्यासाठी केला गेला. आणि मागील काही वर्षापासून तर लोकांना निव्वळ धर्माच्या नावाखाली भावनिक व मुर्ख बनवून हक्क अधिकार, न्याय, आणि सरकारला प्रश्न विचारणाऱ्यांना तुरुंगात पाठवले जात आहे. कर्म लपवण्यासाठी धर्माचा आधार घेतला जात आहे. लोककल्याणाचे कामे न करता जनतेच्या कल्याणाचे पैसे उद्योगपतींच्या घशात घालून लोकशाही ला हुकुमशाही व भांडवलशाही मध्ये ढकलले जात आहे. शिक्षण, नोकरी, महागाई व सत्य बोलणारा दोषी तर धर्मांध हा राष्ट्रप्रेमी म्हणून घोषित केले जाते. सरकारच्या सर्व संस्थांनी स्वतः जनतेचे प्रश्न, समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधने आवश्यक असताना आजची परिस्थिती अशी झाली की जनताच सरकार दरबारी प्रश्न मांडत आहे तरीही सरकार दखल घेत नाही. शेतकरी, विद्यार्थी, महिला, कर्मचारी, बेरोजगार, खेळाडू अशा प्रत्येक वर्गातील समस्या वाढत असताना सरकार मात्र यावर लक्ष न देता धर्माच्या नावाखाली भावनिक बनवून हक्क अधिकारा पासून दुर नेले जात आहे. जर जनतेलाच हक्क अधिकार यापासून दूर ढकलले जात असेल तर सरकारचे व इतर संस्थांचे काम काय हा प्रश्न प्रत्येक नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे. निवडणुकीच्या माध्यमातून जनता आपले प्रतिनिधी निवडून सत्ता परिवर्तन करत असते. परंतु इलेक्ट्रॉनिक मशीनच्या माध्यमातून मताची हेराफेरी व घोटाळे झाल्याच्या अनेक घटना उघडकीस होऊन, जनता इलेक्ट्रॉनिक मशीन बंद व्हायला पाहिजे याची मागणी करून ही ती मशीन बंद होत नसेल तर संविधानाने ज्यांना राजा बनवले त्याच राजाला इलेक्ट्रॉनिक मशीन च्या माध्यमातून स्वतः ची पोळी भाजणाऱ्या व द्वेष पसरवणाऱ्या सरकारने भिकारी बनवले. जर जनताच म्हणत असेल आम्हाला इलेक्ट्रॉनिक मशीन नको आमचा इलेक्ट्रॉनिक मशीन वर विश्वास नाही तरीही निवडणूक आयोग सरकारच्या मदतीने इलेक्ट्रॉनिक मशीनच जर जनतेवर लादत असेल तर जनतेच्या मताला किंमत आणि लोकशाही कुठे हा प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे. इव्हिएमच्या माध्यमातून निवडून येण्यासाठी लोकांच्या मताची गरज नाही. जेथे लोकांच्या मतांची गरजच नाही तिथे लोक कल्याणाचे काम कोण आणि का करणार? जर लोककल्याणकारी कामे करायचे असते तर अगोदर लोकांच्या मताचा आदर केला असता. लोक शिक्षण, रोजगार यावर बोलत असताना सरकार धर्माचा आधार घेऊन लोकांचे शिक्षण, रोजगार बंद करत आहे. याचाच अर्थ लोकशाही मध्ये लोकांच्या मताला किंमत राहली नाही. जनता राजा असुनही गुलामासारखे हाल सुरू आहेत. आणि याला सर्वस्वी दोष सरकारचा ही नाही. तर जनतेचाही आहे. स्वार्थी राजकारण्यांच्या धार्मिक व भावनिक आमिषांना भुलुन चुकीचे उमेदवार निवडून दिले गेले, जनतेचे प्रतिनिधी असलेल्यांनी जनतेचे प्रश्न न सोडवता स्वतः ला आर्थिक भक्कम बनवले. शेकडो करोडोचा भ्रष्टाचार केल्याने आज जनतेचे प्रतिनिधी असुनही, जनतेचे प्रश्न वाढत आहेत हे समजून ही जनतेची बाजु घेता येत नाही. सत्य बोलले किंवा सरकार विरोधात बोलले तर वेगवेगळ्या माध्यमातून वेगवेगळ्या कार्यवाही केल्या जातात. जेथे जनप्रतिनिधी च व्यवस्थेच्या समोर हतबल झाले असतील तेथे जनतेची काय परिस्थिती असेल? हे सर्व सुरळीत करण्यासाठी आणि लोकशाही टिकवून लोकांच्या मताला किंमत मिळवून देण्यासाठी इव्हिएम ला दुर सारून बँलेटपेपरवर निवडणुका झाल्या तर अर्धे प्रश्न सुटतील. परंतु यासाठी धर्म, धार्मिक स्थळे हे बाजूला ठेवून लोककल्याण, शिक्षण, आरोग्य, रोजगार व राष्ट्रप्रेम यावर सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. तरच लोकशाही व लोकांच्या मताला किंमत राहील.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## तीर्थक्षेत्राकडून ज्ञानतीर्थाकडे वाटचाल होणे गरजेचे

आधुनिक केसरी

**सृष्टीवर असणारी सगळी तीर्थ क्षेत्र ज्ञान तीर्थ विकसीत होण्यासाठी असतात आपण तीर्थ क्षेत्र पाहतो अनुभवतो पण त्यामधून ज्ञान तीर्थ विकसीत होणं हाच मुख्य हेतू असतो.जीवनात आत्म ज्ञानाचा साक्षात्कार झालाच पाहिजे.ज्ञान बोध झाल्याशिवाय आत्म उद्धर होत नाही.हा उद्धार यशस्वी होण्यासाठी ज्ञान तीर्थ विकसीत करता आलं पाहिजे आपण आपलं ज्ञान तीर्थ विकसीत केल तर मग आपोआपच जीवनाचा उध्दार होतो.आत्मज्ञान जागृत होण्यासाठी ज्ञान तीर्थ प्रकट झाल पाहिजे अथवा ज्ञान तीर्थाचा विकास झाला पाहिजे.ज्ञान तीर्थ समजलं उमजलं आणि आचरणात आलं तर जीवन हेच एक तीर्थ झाल्याशिवाय राहणार नाही.**

ज्ञान हे बुद्धीमध्ये स्थापित होऊन आचरणात आलं पाहिजे तरच ते ज्ञान जीवनातील सर्व श्रेष्ठ पायरी ठरेल. मानवता, अहिंसा, परोपकार, सात्विकता त्या सोबतच सद्गुणांचे आचरण होण्यासाठी ज्ञान तीर्थ विकसीत व्हावं लागतं.मानवता विकसित होऊन मानवी मूल्यांची जोपासना करण्याबरोबरच संस्कार आणि संस्कृती रक्षणासाठी सात्विक मनोवृत्ती विकसीत व्हावी यासाठी तीर्थक्षेत्र हे प्रभावी ऊर्जास्रोत असतात.हे वास्तव आहे या मध्ये शंका नाही.तीर्थ क्षेत्र ते ज्ञान तीर्थ हा प्रवास आरंभ होऊन तो यशस्वी झाला पाहिजे तरच तो कारणी लागेल.तीर्थक्षेत्राची उर्जा आपण यशस्वी रित्या ग्रहण करून अंगिकारली तर निश्चितच आपल्याला जीवनात मानवता संचारते. आपल्या धर्म शास्त्रानुसार वेगवेगळ्या तीर्थ क्षेत्रांच वेगवेगळ महत्व विशद केलेल आहे. याच अनुषंगाने आपण तीर्थस्थळ तीर्थ स्थान भ्रमंती करत असतो पण तीर्थक्षेत्र तीर्थस्थळ या पवित्र उर्जा चे पावन स्पर्श झाल्यानंतर आपलं ज्ञान हे वृद्धिंगत झालच पाहिजे तरचं तीर्थ क्षेत्र ते ज्ञान तीर्थ हा प्रवास यशस्वी होईल आणि खरया अर्थाने तीर्थक्षेत्र जीवन कल्याणाच माध्यम ठरेल.ज्ञान हे जगातील सर्व श्रेष्ठ असं तीर्थ आहे ज्यांचं एकदा मनोभावे दर्शन घडलं तर जीवन कृतार्थ होत.तीर्थ क्षेत्रा बदल आकर्षण अस्था आवड असणं स्वाभाविक आहे गरजेचं आहे. धर्म शास्त्रानुसार आणि संस्कृती नुसार हि काळची गरज देखिल आहेच.तीर्थ क्षेत्रा कडुन ज्ञान तीर्थाचा प्रवास आरंभ झाला नाही तर मात्र आपण कितीही तीर्थक्षेत्र फिरलो अथवा भ्रमण केले तर फार काही उल्लेखनीय फलनिष्पत्ती हाती येणार नाही कारण तीर्थ क्षेत्र भ्रमंती नंतर ज्ञान तीर्थ विकासीत झालंच पाहिजे तर आणि तरच ते हितार्थ ठरत अन्यथा ते फार फार ती सहल ठरू शकते अथवा आपल्या बाह्य मनाचं वरकरणी समाधान ज्या मधून फार काही उल्लेखनीय हाती लागण्या सारख नसत.ज्ञान हे सृष्टी वरील सर्व उत्कृष्ट असं तीर्थ क्षेत्र आहे याच तीर्थक्षेत्राची जीवनात ज्याला गोडी लागली त्याच जीवन कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही.जीवनाचा उत्कर्ष होण्यासाठी तीर्थ क्षेत्राकडून ज्ञान तीर्थ कडे प्रवास आरंभ होणं गरजेचं आहे.ज्ञान हेच अमृत आहे.पण ज्ञान म्हणजे काय हेच आपल्याला वास्तविक रित्या समजलं नाही. तर मग त्याचा पाहिजे तो लाभ निश्चित होणार नाही मानवतावादी अनुकरण हा ज्ञानाचा आरंभ आहे हे विश्वाची माझे घर चरचरा मध्ये ईश्वराचे स्वरूप आहे याची जाणीव होणं त्या सोबतच आपल्या आचरणातून कृतीतून कोणत्याही प्राणीमात्रांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही असं वर्तन आचरण करण्याचा आरंभ ते विनम्रतेच सर्वोच्च शिखर म्हणजे खरया अर्थाने ज्ञान आरंभ असून दैनंदिन जीवनात कृतीतून एवढं ज्ञान प्रकट झाल तर नक्कीच आपण तीर्थ क्षेत्रा कडून ज्ञान तीर्थ काडे मार्गक्रमण करू या मध्ये शंका नाही.आपण आपलं जीवन ज्ञान तीर्थ बनवलं पाहिजे हेच अंतिम हित आणि साध्य आहे ते साध्य करता आलं पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पोलिसांमुळे कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे

## अवैध धंदे बंद करा; अन्यथा आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**छत्रपती संभाजीनगर :** मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्याला मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, तसेच जिल्ह्याचे नाव जगभर प्रसिद्ध आहे असे असताना बुलढाणा पोलिस प्रशासनाच्या भ्रष्ट वृत्तीमुळे फार कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहे. बुलढाणा शहरातील चर्च समोर,जयस्तंभ चौक ते गॅरेज लाईन,सुवर्ण गणेश मंदिर समोर टाटा ग्राउंड मध्ये, सुंडदरखेड येथील होंडा शो रूम मागे,बजार गल्लीतील शासकीय गाळ्यात, सार्वजनिक बांधकाम विभाग समोर, येळगाव फाटा ,रायपूर,सैलानी, देऊलघाट, चिखली पोलिस स्टेशन हद्दीत शहरातील मध्यवस्तीत बाजार मार्केट येथे खुले आम, वरली, मटके, जुगार अड्डे, नगदी तकदिर का बादशहा असे एक नव्हें अनेक अवैध धंदे जोमात सुरू आहेत या मुळे तरुण पिढी बरबाद होत आहे, अनेक कुटुंबाचे संसार उघड्यावर पडले आहेत, अनेक तरुण व्यसनी बनण्यास सुरुवात झाली आहे, या मुळे अनेक व्यक्ती, गुंड मोकाट फिरत आहेत, दिवसा ढवळ्या लुटमार होत आहे, अनेक महिलांचे दागिने खुलेआम पळविले जात आहेत त्या मुळे पोलिस अधिकारी कर्मचारी यांचा वचक राहिलेला नाही, गावगुंड बाजार मार्केट मद्ये मोबाईल फोन चोरत आहे, या बाबद अर्जदार १ )इसरार अहमद देशमुख, वॉर्ड नं ४ गवलीपुरा, पुरुषोत्तम बोर्डे यांनी अनेक बातम्या प्रकाशित केल्या आहेत व येथिल लोकप्रतिनिधी,सामाजिक कार्यकर्ते यांनी अनेक आंदोलन केले, निवेदन दिले मात्र येथील भ्रष्ट पोलिस प्रशासन आधिकारी कोणतीही कार्यवाही करत नाहीत, उलट तक्रार दाखल करणाऱ्यास धमकी देऊन तक्रार माघे घेण्यास प्रवृत्त केले जाते,त्या मुळे सबंधित पोलिस स्टेशन आधिकारी कर्मचारी यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याने त्यांच्यावर तत्काळ कारवाई करावी व रायपूर, चिखली, बुलढाणा पोलिस स्टेशन हद्दीतील सर्व अवैध धंदे,जुगार अड्डे,वरली, मटका बंद करावा, अन्यथा २६जाने वारी पासून इसरार देशमुख व पुरुषोत्तम बोर्डे जिल्हाधिकारी कार्यालय समोर बेमुदत तीव्र आंदोलन करनार आहोत तसेच आंदोलन काळात तक्रार कर्त्यास काही इजा पोहचली, जिवित्वास हानी झाल्यास त्याची सर्व जबाबदारी प्रशाशन व अवैध धंदे माफिया यांच्यावर राहिल अशी तक्रार १ )इसरार अहमद देशमुख संपादक बुलढाणा समाचार न्यूज चॅनल. बुलढाणा 2 ) पुरुषोत्तम बोर्डे युवा प्रदेशाध्यक्ष अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद महाराष्ट्र यांनी सर्व संबंधितांना तक्रार दिली आहे दिली.



# वडोद बाजार पोलीस ठाण्यात साहाय्यक पोलीस निरीक्षकपदी सुनील इंगळे रूजू

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार पोलीस ठाणे असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे यांची बदली झाली असून त्यांच्या जागेवर सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून सुनील इंगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे मंगळवारी संध्याकाळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे यांना निरोप देण्यात आला. तर नव्याने नियुक्त असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील इंगळे यांनी पदभार स्वीकारला. यावेळी वडोद बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संभाजी खाडे, कर्मचारी शंकर चव्हाण पोलीस सोनू गायकवाड पोलीस दत्ता मोरे पोलीस कर्मचारी मस्के ,योगेश चेळेकर, पोलीस कर्मचारी वक्ते ,पठाण, पोलीस कर्मचारी मालोदे पोलीस कर्मचारी खाकरे व वडोद बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# टाकळी अंबड येथे शेतात चालणारा जुगार बंद करण्याची गावकऱ्यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील टाकळी अंबड हे विहामांडवा पोलीस हद्दीत येते टाकळी गावाशेजारी शेतातील शेड मधे जुगार चालविला जात आहे. पोलिसांच्या संगनमताने जुगार धंदा सुरू आसल्याचा अरोप गावकरी करू लागले. या जुगार आड्यामुळे गावकऱ्यांची अडचण अशी आहे की, गावातील महिला शेतात जाणार्या रस्त्यावर, शाळेच्या मार्गावर शेतात जुगार खेळला जात आसुन शाळकरी मुलांनाही याचा त्रास होत आसुन टाकळी तसेच परिसरातील तरुण कष्टकरी आता या जुगार आड्यावर पैसा घालवत आहे. टाकळी आंबड गाव परिसरातील काही ग्रामस्थांनी याला मुक संमतीने विरोध दर्शवला आहे. या जुगार आड्याला कुणाचे आभय आहे हे गावकर्यांना माहिती असुनही कुणीही तक्रारी करत नसल्याने दिवस रात्र चालणाऱ्या या जुगार आड्यावर कारवाई करण्याची मागणी गावकरी करत आहेत.



# अवैध धंद्याला आळा घाला : डॉ. पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात अवैधरित्या नशेचे साहित्य मिळत आहे शहरात अवैध धंदे ही बोकाळले आहे विशेष म्हणजे नशेचे साहित्य औषधी दुकानात मिळतात यावर आळा बसवा म्हणून शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन देऊन त्याची प्रतिलिपी शहर पोलीस स्टेशन कन्नड यांना देण्यात आली आहे. शहर प्रमुख डॉ. सदाशिव पाटील यांनी या निवेदनात त्यांनी असे म्हटले आहे की शहरांमध्ये तरुणांना सहजपणे अवैध रित्या खुलेआम नशेचे साहित्य मिळते यात फॅन्सीडील, बटन ,व्हाइटनर, पाईपलाईन ला वापरण्याचे सुलोचन, नशेचे चॉकलेट या साहित्याचा वापर करून तरुण वर्ग नशेच्या नादात कोणाच्याही घरात घुसणे, हातावर ब्लेंड मारून घेणे, एकट्या महिला व मुलींना पाहून त्रास देणे, चाकूचा धाक दाखवून लुटण्याचा प्रयत्न करणे, असे प्रकार शहरात घडत असून याचा त्वरित बंदोबस्त करावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर शिवसेनेचे शहर प्रमुख डॉ. सदाशिव पाटील, उपतालुकाप्रमुख शिवाजी थेटे, माजी नगरसेवक बंटी सुरे, उपशहर प्रमुख संजय शिंदे, काकासाहेब ठोकळ, चंद्रकांत लाडे, नंदकुमार शेजवळ शिवसैनिक, युवा सेना अधिकारी रामराजे देशमुख, सचिन गिरी, राज ठाकूर, अक्षय घुगे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.






# ग्रामरोजगार सेवकांचे एक दिवसीय प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** गटविकास अधिकारी पाटील साहेब यांचे मार्गदर्शनाखाली ही मास्टर बाबत 17 जानेवारी रोजी जळगाव जामोद पंचायत समिती सभागृहात ग्राम रोजगार सेवकांचे एक दिवसीय प्रशिक्षण पार पडले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र या योजनेअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरून मजुरांची हजेरीपट ई मस्टर निर्गमित करण्याबाबतची कार्यपद्धती महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये राबविण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ग्रामपंचायत स्तरावर रोजगार सेवकांचे एक दिवस प्रशिक्षण सुरू आहे. त्यासाठी तालुक्यातील ग्राम रोजगार सेवकांचे एक दिवसीय प्रशिक्षण जळगाव जामोद येथे आयोजित केले होते. प्रशिक्षक म्हणून संजय श्रीवास्तव यांनी रोजगार सेवकांना ही मास्टर बाबत सर्व माहिती देण्यात आली. यावेळी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संदीप कुमार मोरे, राजपूत साहेब,ए.पी.ओ.निलेश अवकाळे, सहाय्यक अभियंता अनंता डवंगे,मंगेश हागे, सि,डि.ई.ओ.विशाल नायसे,गणेश देशमुख,स्वाती वानखडे,यांचेसह तालुक्यातील सर्व ग्राम रोजगार सेवक हजर होते



# नवीन वर्षातही प्लास्टिक प्रदूषणाची धग कायम

## वाढत्या प्लास्टिक वापराने जिल्ह्यातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यामध्ये बाजारपेठा,जनरल स्टोअर्स, फळ विक्रेते, मास विक्रेते, कृषी सेवा केंद्रे, मेडिकल तसेच इतर ठिकाणी प्लास्टिक पिशव्यांचा वापर गतवर्षाच्या तुलनेत नवीन वर्षात अधिक जोर धरू लागला आहे. विविध समारंभ, विवाह यांच्यातही पाणी पिण्यासाठी प्लास्टिक ग्लासांचा वापर अधिकचा धोकादायक ठरत आहे.
जिल्ह्यातील वाढलेले प्लास्टिक प्रदूषण हे, जन सामान्यापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत ही अतिशय शरमेची बाब आहे. कारण 75 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदीची घोषणा त्यानंतर सिंगल यूज प्लास्टिकवर (एकल वापराचे प्लास्टिक) बंदी घालण्यात



आली. तर, राज्य सरकारने विघटन होणाऱ्या आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकवरील निर्बंध शिथील केले. या फेरबदलामुळे विक्रेत्यांना मोकळे रान सापडले आहे. ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषद व आरोग्य विभागाकडूनदेखील याबाबत सध्या ढिलाईचे धोरण राबविले जात आहे. त्याचप्रमाणे जिल्हयात विविध भागांमध्ये सध्या प्लास्टिकचा कचरा जाळला जात असल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे. ही बाब पर्यावरणाच्या दृष्टीने अतीशय घातक आहे. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरणविषयक संस्थेच्या म्हणजे UNEP च्या अंदाजानुसार पृथ्वीवर जमा होणाऱ्या कचऱ्याचं एकूण वजन हे पृथ्वीवरच्या सर्व माणसांच्या एकूण वजनाइतकं झालं आहे. प्लॅस्टिकचा विचार केला तर प्लॅस्टिक कचऱ्याच्या निर्मितीच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या स्थानावर आहे, असं ग्लोबल प्लॅस्टिक वॉच वेबसाईटचा २०२१चा अहवाल सांगतो. या कचऱ्यात महाराष्ट्राचा आणि विशेषतः मुंबईचा वाटा सर्वांत मोठा आहे. महाराष्ट्रात दरवर्षी चार लाख टनांहून अधिक प्लॅस्टिक कचरा तयार होतो, असं केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची आकडेवारी सांगते. धाराशिव जिल्हा ही सुस्त कर्मचारी व ना समज नागरिकांमुळे प्लास्टिक कचरा वाढीमध्ये अग्रेसर होत चालला आहे. जिल्ह्यामध्ये प्लॅस्टिक प्रदूषणाबाबत जनजागृती चा कायम अभाव आहे. त्याचबरोबर प्लास्टिक विक्रेत्यावर कारवाई न करता त्याच्याकडे साफ दुर्लक्ष अधिकारी वर्गा कडून केले जात आहे. वापर करून दिलेल्या प्लास्टिक मुळे जलप्रदूषण, वायु प्रदूषण झपाट्याने वाढत आहे. त्याचा नागरिकांचा आरोग्य घातक परिणाम होत आहे. जिल्ह्यातील विविध भागात पसरलेले प्लॅस्टिक जनावरांच्या पोटात जाऊन जनावरे दगावण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे लवकरच या प्लास्टिक वापराचा गळा सर्व स्तरातील जनमाध्यमातून आवळला नाही,तर प्लास्टिकच्या विळख्यामध्ये सर्व निष्पाप जीव गुदमरले जातील.




# धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाला छत्रपती संभाजीनगर व धाराशिव नावाचा विसर

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** राज्य सरकारने 16जुलै2022 रोजी औरंगाबाद आणि उस्मानाबाद या दोन्ही शहरांची नावे बदलण्याचा ठराव मंजूर केला, महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद आणि उस्मानाबाद या शहरांच्या नामांतराच्या निर्णयाला केंद्र सरकारनेही 24 फेब्रुवारी 2023 रोजी मंजुरी दिली. उस्मानाबादचे शहराचे धाराशिव तर औरंगाबाद शहराचे नामकरण छत्रपती संभाजीनगर असे करण्यात आले. त्यानंतर जिल्ह्यातील शासकीय कार्यालय, कॉलेज, दवाखाने, जिल्हाधिकारी कार्यालय, न्यायालये व इतर शासकीय, निमशासकीय कार्यालयाकडून शासनाच्या नामांतराच्या निर्णयाच्या परिपत्रकानुसार कार्यालयाच्या नावात बदल करण्यात आले. मात्र धाराशिव व छत्रपती संभाजी नगर जाणाऱ्या सोलापूर-धुळे क्र-52 या राष्ट्रीय महामार्गाला 2023 या वर्षभरात महामार्गाच्या रोड लगत असणाऱ्या पाट्यावरील नाव बदलण्यात रस वाटला नाही. या राष्ट्रीय महामार्गावर धाराशिव व छत्रपती संभाजी नावे दिसुन येत नाहीत. पूर्वीच्या उस्मानाबाद व औरंगाबाद नावाच्या पाट्यावर अनेक ठिकाणीं काळे फासलेले आहे. तर अनेक ठिकाणी जुन्याच नावाचे फलक आहेत.या नवीन वर्षात तरी संबंधित प्रशासन छत्रपती संभाजीनगर व धाराशिव नावाचे फलक लावतील की,फलक लावण्यासाठी शासनाकडुन कारवाईची प्रतीक्षा करत आहेत. हेच महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांमधून बोलले जात आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त 'फॅम'ने विद्यार्थ्यांना वाटले वही, पेन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** फेस ऑफ आंबेडकर राईट मुव्हमेंटने (फॅम) हर्सूल नवीन वसाहत येथील महानगर पालिकेच्या प्राथमिक शाळेतील 250 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 5 वह्या व २ पेनचे वाटप केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी राबविलेल्या 'एक वही, एक पेन' अभियानातून जमा झालेले वही, पेन व इतर शैक्षणिक साहित्य हे गरजू व गरीब विद्यार्थ्यांना मोफत वाटप केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त हर्सूल नवीन वसाहत येथील महानगर पालिकेच्या प्राथमिक शाळेत साहित्याचे वाटप करण्यात आले. पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ देण्यात आला. शोषित घटकांपर्यंत शिक्षणाचे महत्त्व पोहोचावे तसेच शिक्षणापासून कोणी वंचित राहू नये, यासाठी 'फॅम'ने गेल्या ९ वर्षांपासून हे अभियान हाती घेतले आहे. या कार्यक्रमासाठी मनीष नरवडे, विशाल आढाव, दौलत सिरसवाल, गौतम बावस्कर, संदिप बोराडे शैलेश चाबुकस्वार, आदींनी परिश्रम घेतले.
या उपक्रमासाठी शाळेतील शिक्षक जे. एस. सपकाळ, ए. एस. पवार. श्रीमती के.बी. लहाने, एम. व्ही. मोरे, डि. ए. बागुल, डी. बी. म्हस्के, बालताई पाचलोरे, फुले, मॅडम, हरणे ताई,इ शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.



# बेगमपुरा पोलिसांनी, माणुसकी समूहाने दिला महिलेला मायेचा निवारा

## माणुसकी वृद्ध सेवालय येथे पुनर्वसनासाठी केले दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** आपल्या घरातील स्त्री बाहेर गेली आणि घरी परत यायला तिला उशिर झाला की जीव कासाविस होतो.रात्री अपरात्री काही झालं तर? मात्र ती घरात सुखरूप आल्या नंतर आपली काळजी संपते.घरातल्या चार भिंतींच्या मर्यादेत ती सुरक्षित असते.पण अशाच असुरक्षित व धोक्याच्या वातावरणात कित्येक स्त्रिया रात्री भटकत असतात;ती कुणाची तरी आई, मुलगी,अथवा पत्नी, किंवा बहीण असेल. पण त्यांची वाट पाहणारं असं कुणीच नाही. अशा अनेक महिला ज्यांना त्यांच्या आपल्या लोकांनीच व समाजाने देखील सोडून दिलं आहे. कारण त्या आजारी आहेत मनोविकृत आहेत. बेगमपुरा शहर पोलीस स्टेशन हद्दीत बिना जॉर्ज श्रीसूंदर वय ३८ वर्ष हि महिला मुकबधीर शाळेत आतापर्यंत शिक्षण घेत होती परंतु तिच्या वयानुसार शाळेतुन तीला काढण्यात आले तिची आत्या हिने तीस काही दिवस सांभाळ केला परंतु आता सांभाळ करणे शक्य नसल्याने तिचे आत्या भाऊ यांनी बेगमपुरा पोलीसांना माहिती दिली असता पोलीसांनी तीची विचारपूस केली असता तीला बोलताही येत नाही आयकुहि येत नाही ती मुकबधीर आहे ती रडायला लागली माझी मदत करा? पोलीसांनी तीला बेगमपुरा पोलीस स्टेशन आणले व उपपोलीस निरिक्षक शेख यांनी महिलेची विचारपुस केली असता तीने आपली आपबीती मुख भाषेत सांगीतली. की बाहेर एकट्या महिलेने कसं राहायचं म्हणून आज साहेब तुम्ही माझी मदत करा असे मुख भाषेत सांगून पोलिसांना तिच्यावर घडलेली आपबीती सांगितली असता पोलीसांनी त्या माणुसकी रुग्ण समूहाचे सामाजसेवक श्री सुमित पंडित यांचे नाव पुढे आले त्यांना माहिती दिली,असता सुमित पंडित यांनी त्या महिलेला पुनर्वसना साठी कायदेशीर कागदोपत्री प्रक्रिया पुर्ण करुन व शासकीय रुग्णालयात नेण्याचे ठरवले,व माणुसकी वृध्दाश्रम येथे पुणर्वसनासाठी मदतकार्य केले.या सामाजिक कार्यात आम्रपाली तायडे पोलीस निरीक्षक बेगमपुरा,हरेश्वर घुगे,साय्यक पोलीस निरिक्षक,हारून शेख,विनोद भालेराव,पोलीस



महिलेची चौकशी केली असता. पुनर्वसनासाठी कुठल्या समजिक संस्थेचे स्वयंसेवक काम करतात का,त्यात पोलीसांनी सु-लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि सायाक्राटिक्स विभाग व प्रथोमपचाराकरीता घाटी दवाखान्यात दाखल केले.व मेडिकल करुन समाजसेवक सुमित पंडित यांनी आपले माणुसकी वृध्द सेवालय येथे पुणर्वसनासाठी उप निरीक्षक,गजानन तुपे,प्रवीण बोदवडे, सर्व पोलीस स्टेशन बेगमपुरा व माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडित, समाजसेवीका पुजा पंडित आदींनी मेहनत घेतली.

# सत्ताधारी आदिवासींबाबतीत भेदभाव करतात : आव्हाड

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेतून सर्वांना समान अधिकार दिले. आरक्षणामुळे बहुजन शिक्षण घेऊ शकला. पण, बाबासाहेबांनी न्यायपालिकेत आरक्षणाची तरतूद केली नाही. हा ८० टक्के बहुजन समाजावर अन्याय झाला. कारण, अनेक खटल्यांचे निकाल आम्ही जेव्हा वाचतो, तेव्हा त्यातून जातीयतेचा वास येतो, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केले.
सामाजिक संघटनांतर्फे डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात मंगळवारी सामाजिक न्याय परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमात 'आरक्षण म्हणजे हक्क' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. अध्यक्षस्थानी विचारवंत नागेश चौधरी होते. आव्हाड म्हणाले, रामाने शबरीची उष्टी बोरं खाल्ली होती. मात्र, आता सत्ताधारी आदिवासींबाबतीत भेदभाव करतात. राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना नवीन संसद भवनाच्या उद्घाटनाला निमंत्रित करण्याचे टाळतात. सत्ताधारी महिला आणि आदिवासीविरोधी मानसिकतेचे आहेत. त्यामुळेच त्यांनी राष्ट्रपती मुर्मू यांना संसदेच्या उद्घाटनाला बोलावले नाही. सामाजिक न्यायाकरिता आरक्षण आहे. आरक्षण म्हणजे असमानतेपासून रक्षण आहे. मंडल आयोगाने ओबीसी समाजाला आरक्षण देण्याची भूमिका घेताच ज्यांनी विरोध केला, ते आज ओबीसींचे रक्षणकर्ते असल्याचे भासवत आहेत. तेच लोक ओबीसींचे आरक्षण काढले जाईल, अशी भीती निर्माण करीत आहेत, अशी टीका आव्हाड यांनी केली. ओबीसी समाजाला राज्यघटनेने आरक्षण दिले आहे. राज्यघटनेतील ३४० कलमानुसार ओबीसींचे आरक्षण आहे. आरक्षण ही भीक नव्हे हक्क आहे. ते कोणीही काढून घेऊ शकत नाही, असेही आव्हाड म्हणाले.

# निधी उपलब्ध करुन ओतूर धरणाचा प्रश्न मार्गी लावणार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची शेतकऱ्यांना ग्वाही

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** ओतूर धरणाच्या विशेष दुरुस्तीच्या कामासाठी आमदार नितीन पवार हे सातत्याने आग्रही असून त्यांचा माझ्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. स्व ए. टी. पवार यांनी ओतूर धरणाचे पाहिलेले स्वप्न त्यांना पूर्ण करायचे आहे.त्यामुळे ओतूर धरणाचा प्रश्न मी मार्गी लावणार आणि निधी उपलब्ध करुन देणार, तसेच विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ओतूर परिसरातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाला दिली.

ओतूर लघुपाटबंधारे प्रकल्पामधून मोठ्या प्रमाणावरील पाणी गळती थांबविण्याचे काम तातडीने पूर्ण करावे या मागणीसाठी ओतूर परिसरातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने आमदार नितीन पवार यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन या प्रकल्पाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिष्टमंडळाच्या समस्या जाणून घेत



सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडून नियोजन विभागाकडे दाखल झाला असून नियोजन विभागाकडुन आज उद्याकडे वित्त विभागाकडे जाणार आहे. वित्त आणि नियोजन विभाग हे दोन्ही विभाग माझ्याकडे असल्यामुळे मीं तुमचा प्रश्न मार्गी लावणार असून ओतूर धरण पूर्ण करण्याचा आमदार नितीन पवार यांना शब्द दिला आहे. त्यामुळे तुम्ही कुणाच्याही भूलथापाना बळी पडू नका, ओतूर धरणाचा प्रश्न मींच मार्गी लावणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिली. ओतूर व परिसरातील १४/१५ गावांना महत्वपूर्ण असलेल्या ओतूर येथील जुन्या लघुपाटबंधारे प्रकल्पामधून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असून या प्रकल्पाचा पाणीसाठा दीड ते दोन महिन्यातच संपतो .त्यामुळे सिंचनासाठी या प्रकल्पाचा उपयोग होत नाही. पाणी गळती थांबविण्यासाठी उपाययोजना करावी, प्रकल्पाच्या कायमस्वरूपी दुरुस्ती कामासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात शेतकऱ्यांनी केली आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र भामरे, भूषण पगार, सुधाकर खैरनार, बळीराम देवरे, संदीप शिंदे, रविकांत सोनवणे, दिगंबर पवार, मावंजी गायकवाड, अतुल देवरे, हिरामण वाघ, समाधान देवरे, जितेंद्र वाघ,उमेश वाघ,निंबा मोरे, महादू मोरे, रमेश दशपुते, काशिनाथ ठाकरे नंदू देवरे गोकुळ देवरे सतीश देवरे रामभाऊ देवरे सुभाष पगार बालू वाघ भैय्या वाघ आदी उपस्थित होते.

ओतूर प्रकल्पाचा सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडून वित्त व नियोजन विभागाकडे दाखल करण्यात आला आहे.दोन्ही विभाग उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आहे.

ओतूर प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीसाठी व कळवण सुरगाणा तालुक्यातील विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही असा शब्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कळवणच्या मेळाव्यात दिला आहे.ते शब्दाला पक्के आहेत त्यामुळे पुढील काळात निधी उपलब्ध होईल.

# अन्यायग्रस्त शिक्षकांसाठी शिक्षण उप संचालक कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** विनय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जळगाव सपकाळ, ता. भोकरदन येथील कर्मचारी गजानन पंजाबराव सपकाळ, विकास विठ्ठलराव सपकाळ, विश्वास कैलासराव सुसर दत्तात्रय लाड या कर्मचाऱ्यांची प्राचार्य एन एस भुतेकर हे सुडभावनेने मानसिक व आर्थिक छळवणूक करत आहे. शासन निर्णय दिनांक 6 फेब्रुवारी 2023 नुसार महाराष्ट्र शासनाने 20 टक्के अनुदान मंजूर केलेले आहे मात्र प्राचार्य भुतेकर हे वेतन अनुदानापासून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वंचित ठेवत आहे. अन्यायग्रस्त शिक्षक महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्तीनुसार व शासकीय नियमानुसार आपले सर्व शालेय कार्य व कर्तव्य प्रामाणिकपणे पार पडत आहे. शैक्षणिक वर्ष 2010 पासून प्राचार्य भुतेकर यांनी कार्यभार स्वीकारला त्यानंतर वेगवेगळ्या कारणांनी ते कर्मचाऱ्यांचे आर्थिक व मानसिक शोषण करत आहेत तसेच विद्यार्थी व पालक यांचे समोर कर्मचाऱ्यांचा सार्वजनिक ठिकाणी अपमान करणे या व इतर अन्यायकारक गोष्टी ते हेतू पुरस्सर करत आहे.

**कर्मचाऱ्यांच्या मागण्या :** १)शालार्थ आयडी तात्काळ देण्यात यावा २) सर्व थकीत वेतन तात्काळ मिळावे ३) कर्मचाऱ्यांची मानसिक व आर्थिक पिळवणूक तात्काळ रोखावी ४) सेवा पुस्तिका अद्ययावत करून तात्काळ देण्यात याव्यावरील न्याय मागण्याची तत्काळ दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी नसता मराठवाडा शिक्षक संघटना लोकशाही मार्गाने व अभिनव पद्धतीने आपल्या कार्यालया समोर आंदोलन करेल व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची असेल, असा इशारा मराठवाडा शिक्षक संघ छत्रपती संभाजी नगर या संघटनेचे सचिव भाई चंद्रकांत चव्हाण यांनी दिला आहे निवेदनावर सहसचिव नवनाथ मैत्री, शहराध्यक्ष अजय कदम, विलास चांदणे तालुकाध्यक्ष खुलताबाद, सदस्य विनोद केनेकर, अशोक ढमढेरे यांच्या व अन्यायग्रस्त शिक्षकांच्या सह्या आहेत.



# इंधनाची बचत हे बसचालक व यांत्रिक कर्मचाऱ्यांचे आद्यकर्तव्य होय

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस वर होणारा खर्च हा एकूण खर्चाच्या ४०टक्के आहे, हा खर्च इंधन बचत करून कमी करता येऊ शकतो यासाठी बस चालक व यांत्रिक विभागातील कर्मचारी यांनी बसच्या प्रत्येक बाबीवर व्यवस्थित लक्ष देऊन आपले कर्तव्य पार पाडले तर हा खर्च निम्म्यावर येऊन महामंडळाची आर्थिक स्थिती उंचावून कर्मचारी वर्गाला ही याचा आर्थिक लाभ होऊ शकतो असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी मंगळवार(ता,१६)रोजी येथील बस आगारात आयोजित इंधन बचत मासिक कार्यक्रम १६ जानेवारी २०२४ -ते१५फेब्रुवारी२०२४ चे उदघाटन करताना केले,

या प्रसंगी अध्यक्षस्थानी आगार प्रमुख किरण धनवटे होते, तर प्रमुख उपस्थितीत एसटी विभागाचे अधिकारी अ. ल. घोडके, अविनाश पायकवंडे,अंबादास घोडके,नवनाथ बोडखे, श्री पेहरकर, तसेच आगारातील यांत्रिक विभागातील कर्मचारी,चालक व कर्मचारी उपस्थित होते,या समयी इंधन बचत बाबत उपस्थितांनी इंधन बचत चा संकल्प ही केला.

# वेश्याव्यवसाय; दोन परदेशी तरुणी ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** विमानगर भागातील एका हॉटेलमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने कारवाई केली. या कारवाईत राजस्थानी अभिनेत्रीसह उझबेकिस्तानमधील दोन तरुणींना ताब्यात घेण्यात आले. दलाल परराज्यातील असून, ऑनलाइन पद्धतीने वेश्याव्यवसाय चालवित असल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

याप्रकरणी दलाल इरफान उर्फ राहुल मदन उर्फ मदन सन्यासी आणि रोहित (पूर्ण नाव पत्ता महित नाही) यांच्याविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक अधिनियम कायद्यान्वये विमाननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विमानगर भागातील एका हॉटेलमध्ये मंगळवारी रात्री ही कारवाई करण्यात आली. आरोपी इराफान आणि रोहित परराज्यातील आहे. ते ऑनलाइन पद्धतीने वेश्याव्यवसाय चालवित होते.




# देवावरील भक्तीप्रेम कोणत्याही विपरीत परिस्थितीत विचलित होत नाही

## मठाधिपती रामगिरी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** परमेश्वरावर असलेले निस्सीम भक्ती प्रेम कोणत्याही विपरीत परिस्थितीत कदापिही विचलित होत नाही हे रामभक्तांनी प्रभू रामचंद्र यांची कारसेवा मनोभावे करून दाखवून दिले,असे वक्तव्य वैजापूर येथील कारसेवकांच्या सन्मान -सत्कार सोहळ्यात मंगळवार(ता,१६) रोजी लक्ष्मीनारायण लॉन मध्ये सरला बेटाचे मठाधिपती हभप रामगिरी महाराज। यांनी भाजपाच्या वतीने एकनाथ जाधव यांनी आयोजित कार्यक्रमात केले,प्रभू रामचंद्र यांचे आचरण म्हणजे धर्म होय, अशी धर्म सेवा करणारे कार सेवक खरोखरभाग्यवंत आहेत असेही महाराज म्हणाले. प्रभू रामचंद्र यांच्या प्रत्येक कृतीचे आचरण हाच खरा धर्म आहे असेही महाराज पुढे म्हणाले,तसेच Wकाही दिवसांपूर्वी जितेंद्र आव्हाड यांनी प्रभू रामचंद्र यांच्या विषयी जे अभद्र वक्तव्य केले होते , त्याचा तीव्र शब्दात निषेध केला व यापुढे असे बिनबुडाचे वक्तव्य कदापिही सहन केल्या जाणार नाहीत असा इशारा ही दिला, खा,शरद पवार यांनी देशाला रामायण-महाभारताची गरज नाही असे जे वक्तव्य केले होते त्याचा ही रामगिरी महाराज यांनी निषेध केला.

वैजापूर शहर, तालुका, बाहेरच्या तालुक्यातील ज्या कारसेवकांनी अयोध्या येथे जाऊन कार सेवा केली त्या सर्वांचा उपस्थित सर्व महाराजांच्या हस्ते स्मृती चिन्ह व शाल देऊन सत्कार केला. एकनाथ जाधव व सौ, हर्षदा जाधव यांनी हभप रामगिरी महाराज यांचे पूजन केले,आणि प्रास्ताविक केले ,जेष्ठ नागरिक भगवानदास भाटिया,बाळासाहेब चव्हाण, व दामोदर पारीख,श्री, कदम यांनी अनुभव कथन केले,तर उपस्थित सर्व कार सेवकांना स्मृती चिन्हे देऊन त्यांचा यथोचित सन्मान व गौरव करण्यात आला,या प्रसंगीहभप राजेश्वरगिरी महाराज,भरतगिरी महाराज,विष्णुगिरी महाराज,हभप रामभाऊ महाराज व तालुक्यातील ईतर सर्व महाराज शिवाय जे,के,जाधव, भाजपा तालुका अध्यक्ष नारायण कर्डक, माजी अध्यक्ष श्री तुपे, प्रशांत कंगले, दशरथ बनकर, मधुकर वालतूरे, जयमाला वाघ,कॅप्टन शिवनाथ राहणे चांडगाव,धोंडीरामसिंह राजपूत, रवींद्र आप्पा साखरे, पत्रकार संघ अध्यक्ष भानुदास धामणे, बाबासाहेब धुमाळ, अशोक बोराडे, गौरव धामणे, मकरंद कुलकर्णी, दिनेश राजपूत,सम्राट राजपूत, बंटी संतपाळ यांच्या सह तालुक्यातील कारसेवक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डाभा येथे अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचा आज समारोप व महाप्रसाद

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील डाभा येथे पन्नास वर्षे पासून अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा कायम, संगीतमय भागवत कथा व भव्य किर्तन सोहळ्याचे आयोजन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते. हभप वै.गुरुवर्य फुलसिंग महाराज साकेन,हभप गुरुवर्य वै.नारायण महाराज चारुतांडा व हनुमंतरायाच्या आशिर्वादाने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते.दि. १२ जानेवारी २०२४ पासून या सोहळ्यास प्रारंभ झाला असून श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते हभप संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा हे आहेत.गुरुवार दि.१८ जानेवारी २०२४ रोजी सकाळी 11 ते 1 यावेळेत हभप भगवान महाराज काळपिरकर यांच्या काल्याचे किर्तनाने समारोप होणार आहे.यांच्या काल्याच्या कीर्तनाने या भव्य दिव्य सोहळ्याचा समारोप होईल. नंतर १ ते ४ महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. तरी या सोहळ्याचा पंचक्रोशीतील मोलखेडा, घाणेगांव तांडा, पिंपळवाडी, महाल्बद्दा, चारुतांडा, देव्हारी,नांदा तांडा, टिटवी, सावळदबारा व डाभा गावातील भाविकांनी काल्याच्या किर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन डाभा येथील ग्रामस्थांच्या वतीने श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते हभप संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा यांच्या कडून करण्यात आले आहे.

# माळेगाव यात्रेत पं. समितीचा प्लास्टिकमुक्तीचा बोजवारा

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** आयएएस प्रशासकिय अधिकारी कितीही चांगले असले तरी त्यांच्या हाताखाली काम करणारी यंत्रणा कुचकामी असेल तर शासनांची योजना व प्रशासकीय अधिकाऱ्याची संकल्पना ही फोल ठरते याचाच प्रत्यय माळेगाव यात्रेत यंदा आला असुन माळेगाव यात्रेत स्वच्छतेचा बोजवारा उडाला जागोजागी कचरा व प्लॉस्टीकचे ठिगारे पडले असुन लोहा पं.स.ची प्लॉस्टीक मुक्ती फक्त कागदावरच असल्याचे चित्र माळेगाव यात्रेत पहावयास मिळत असुन जि.प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाला लोहा पं.स.चे गटविकास अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केराची टोपली दाखवली असल्याची चर्चा जनतेतून होत आहे.

नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी



अधिकारी मिनल करनवाल यांनी माळेगाव यात्रा सुरू होण्याच्या पूर्वी जि.प. च्या माळेगाव यात्रेच्या जवळपास १६० एकर जागेवरील अतिक्रमण काढून धडाकेबाज निर्णय घेतला या निर्णयाचे जनतेतून फार कौतुक झाले.

दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेली श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा ही शासकीय स्तरावर दि. १० जानेवारी पासून सुरू झाली व १५ जानेवारीला संपली आणखी माळेगाव यात्रा ही ८ ते १० दिवस राहते ग्रामीण भागातील नागरिक हे लाखोंच्या संख्येने माळेगाव यात्रेत येतात येथे मुलभूत सोयीसुविधेचा बोजवारा उडाला असुन प्लॉस्टीक मुक्ती संकल्पनेचे तीन तेरा वाजले आहेत माळेगाव यात्रेत प्लॉस्टीकचे ठिगारे मोठ्या प्रमाणात पडले आहेत. लोहा पं.स.ची प्लॉस्टीक मुक्ती ही केवळ कागदावरच आहे. लोहा पं.स.चे प्रभारी बीडीओ, विस्तार अधिकारी, कर्मचारी,, ग्रामसेवक यांनी दि. १० जानेवारी माळेगाव यात्रेच्या पहिल्या दिवशी मासिक सभा घेऊन हातात हॅन्ड क्लोज घालुन प्लॉस्टीक मुक्तीची शपथ घेतली व जि.प. शाळेत व आकाशी पाळण्याच्या रोडवरील थोडेफार प्लॉस्टीकच्या बाटल्या , ग्लास उचलुन फोटोसेशन करुन देखावा केला व दुसऱ्या दिवशी पासून याकडे पाठ फिरवली त्यामुळे माळेगाव यात्रेत प्लॉस्टीकचा कचरा मोठ्या प्रमाणात पसरला आहे जागोजागी ढिकारे दिसत आहेत तसेच माळेगाव यात्रेत या प्लास्टिकच्या कचऱ्या बरोबरच मोठ्या प्रमाणात धुळ पसरली आहे. खराब फळे, अन्न ,ही फेकून दिले तसेच अनेक ठिकाणी उघड्यावरील शौचालयमुळे काही भागात दुर्गंधी ही पसरली आहे.

तेव्हा याकडे जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः लक्ष देऊन लोहा पं.स. च्या गटविकास अधिकाऱ्यांसहीत सर्व अधिकारी ,कर्मचारी, सर्व ग्रामसेवक यांच्याकडून माळेगाव यात्रेत स्वच्छता मोहीम राबवून प्लास्टिक मुक्ती मोहीम राबवून प्रदुषण मुक्त माळेगांव यात्रा करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

## प्राध्यापिका सोनाली देवरे यांचे संशोधन इलेक्ट्रॉनिक्स -प्राणीशास्त्राचे यूके पेटंट दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** मविप्र समाज संस्था संचलित सटाणा येथील



कर्मवीर आबासाहेब तथा ना म सोनवणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागात कार्यरत असलेल्या प्राध्यापिका सोनाली देवरे (काकुळते) यांनी केंद्र शासनाकडील पेटंट कार्यालयात दाखल केलेल्या फिशिंग रॉड विथ इलेक्ट्रिक सेडेटीव्ह या पेटंट आराखड्यास मंजुरी देण्यात आली.

या संशोधनामुळे अन्नाकरिता व इतर संशोधनाकरिता लागणारे मासे त्यांना पाण्यातील पर्यावरणास कुठलीही हानी न पोहोचवता विद्युत प्रवाह द्वारे बेशुद्ध करून जिवंत पकडण्यास मदत होणार आहे.त्यांना या संशोधनास मनमाड येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे डी वसईत यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रा.सोनाली देवरे यांचे ४ आंतरराष्ट्रीय व ४ राष्ट्रीय शोधनिबंध प्रसिद्ध आहेत तसेच त्यांचे पीएचडी पदवी करिता संशोधनकार्य ही सुरू आहे. त्यांच्या संशोधनाकरिता मविप्रचे अध्यक्ष डॉ सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल,सरचिटणीस ॲड नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी,सर्व तालुका संचालक,सटाणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय मेधने सटाणा महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.एस. डी. पगारे प्रा श्रीमती पी.एस. आंबेकर प्रा. डॉ.ए. के. येवले, प्रा. श्रीमती टी.डी. काकुळते प्रा श्रीमती एस. डी. निकम व संपूर्ण महाविद्यालय परिवाराने त्यांचे अभिनंदन केले.



## रिसोड तालुक्यात थंडीचा कडाका; नागरिकांकडून शेकोटीचा आधार

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** मागील दोन दिवसांपासून रिसोड तालुक्यात थंडीचा कडाका वाढला आहे. पावसामुळे हवेत गारठा निर्माण झाल्याने चांगलीच थंडी जाणवत आहे. थंडीपासून बचावासाठी आता जिल्ह्यातील ग्रामीण भागात नागरिक शेकोट्यांचा आधार घेत आहेत. ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्याचे पहायला मिळत आहे. तसेच काही जण गुलाबी थंडीचा आनंद घेत बाहेर फीरताना दिसत आहेत. तर अनेकांनी गारवा वाढल्याने घरीच बसणे पसंत केले आहे. मागील काही दिवसांपासून जिल्हात पावसाचे वातावरण होते. पावसामुळे थंडीत वाढ झाली आहे. कमाल तापमान देखील घटले आहे. पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला असून, थंडीत वाढ झाली आहे. थंडी वाढल्याने शहरात दाट धुके पसरल्याचे दिसले धुक्यामुळे सकाळी-सकाळी काही प्रमाणात दृष्यमानताही कमी झाली होती. दरम्यान एकीकडे अवकाळी पाऊस तर दुसरीकडे थंडीमुळे पडलेले धुके यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. धुक्यामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव होताना दिसत आहे. हरभारा पिकावर आळी पडली आहे. धुक्यामुळे वेचणीसाठी आलेला कापूस भीजल्याने तो वेचताना अनेक अडचणींचा सामना मजुरांना करावा लागत आहे. तसेच धुक्याचा इतर पिकांना देखील मोठा फटका बसला आहे.

## तांत्रिक अडचणींमुळे बहुतांश दूध उत्पादक शासकीय अनुदानास मुकणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** शासनाने गाईच्या दुधास प्रतिलिटर ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र तांत्रीक अडचणींमुळे बहुतांश दूध उत्पादक शासकीय अनुदानास मुकणार आहेत.

दुध उत्पादक शेतकऱ्यांना गाईच्या दुधास प्रतिलिटर ५ रुपये अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. हे अनुदान थेट बँक खात्यात वर्ग करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. अनुदान प्राप्त करण्यासाठी शेतकऱ्याचे नाव, आधारकार्ड, संलग्न बँक खात्याची माहिती, पशुधनांची संख्या आणि त्यांचे एअर टॅग क्रमांक असे अनेक कागदपत्रे संकलन केंद्रांना सादर करावे लागणार आहेत. मात्र बहुतांश शेतकऱ्यांकडे एअर टॅग नसल्याकारणाने आणि बहुतांश शेतकऱ्यांकडे एअर टॅग असुनही भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी नसल्याकारणाने या अनुदानाला दुध उत्पादक मुकणार आहेत. ही योजना योजना दि.११ जानेवारी २०२४ ते १० फेब्रुवारी २०२४ या कालावधीकरीता राबविण्यात येत आहे. सहकारी दूध संघ व खाजगी दुध प्रकल्पांमार्फत दुध उत्पादक शेतकरी यांना ३.५ फॅट ८.५ एसएनएफ या गुण प्रतिकरीता किमान २७ रुपये प्रति लिटर इतका दर संबंधित दुध उत्पादक शेतकऱ्याच्या वैयक्तिक बँक खात्यावर रोख विरहीत पध्दतीने देणे बंधनकारक राहील. तद्नंतर, शेतकऱ्यांना शासनामार्फत ५ रुपये प्रतिलिटर बँक खात्यांवर थेट वर्ग करण्यात येणार आहे. नोव्हेंबर २०२३ मधील आकडेवारीनुसार सहकारी दूध संघ व खाजगी दुध प्रकल्पांमार्फत होणारे दुध संकलन १४९ लाख लिटर प्रतिदिन इतके आहे. प्रस्तावित ५ रु प्रतिलिटर अनुदानप्रमाणे एक महिन्याच्या कालावधीकरीता अंदाजित रू.२३० कोटी इतके अनुदान देणे अंदाजित आहे. प्रत्यक्ष होणाऱ्या दुध संकलनातील घट वा वाढ यानुसार उपरोक्त रकमेत बदल होण्याची शक्यता आहे. शासनाने अनुदान जाहीर केल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत असले तरी शासनाने तांत्रिक अडचणी शिथिल कराव्यात अशी मागणी दूध उत्पादकांनी केली आहे.

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वाहतूक ब्लॉक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** यशवंतराव चव्हाण (मुंबई-पुणे) द्रुतगती महामार्गावर गुरुवारी सव्वापाच तासांचा वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. चिखले ब्रिज (साखळी क्रमांक कि.मी. ०७/५६०) येथे मुंबई वाहिनीवर मुंबई रेल विकास महामंडळामार्फत गुरुवारी (१८ जानेवारीला) गर्डर बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. या कामासाठी द्रुतगती मार्गावर सकाळी ११ ते दुपारी १.१५ वाजेपर्यंत, तर दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे.

## सायाळ येथे परंपरागत कृषि विकासयोजनेअंतर्गत सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** १५ जानेवारी रोजी लोहा तालुक्यातील मौजे सायाळ येथे कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा, नांदेड अंतर्गत परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेती) सन २०२३-२४ (८५० गट ) तालुका कृषि अधिकारी लोहा अंतर्गत गाव पातळीवरील दुसरे प्रशिक्षणात सेंद्रिय शेती पद्धतीनुसार किड व रोग नियत्रंण, निविष्ठा उत्पादन व वापर, तण नियंत्रण, कामगंध सापळे, पिवळे चिकट सापळे, पक्षीथांबे ई.वापर, जमिनीत सूक्ष्मजीवाणुचा वापर, सेंद्रिय प्रमाणिकरण कार्यपद्धती, शेतकरी दैनंदिनी नोंदी करणे. ई.विषयाचे प्रशिक्षण मा.श्री. अनिल गवळी प्रकल्प संचालक, श्रीमती माधुरी सोनवणे प्रकल्प उपसंचालक, श्री. संदानद पोटपेलवार तालुका कृषि अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले, सायाळ येथील मारोती मंदिर येथे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणपत जामगे शिवणी जा. देवीदास मोरे, अमृत मोरे, मोहन येवले, सोहेल सय्यद सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक सेंद्रिय शेती प्रशिक्षक शिवाजी भारती सर, प्रगतशील शेतकरी रत्नाकर ढगे,पाणी फाउंडेशनचे श्री.राजाभाऊ कदम, सतिश भिसे,व , ग्रामपंचायत सदस्य, सायाळ, शे लगाव , पिंपळगाव, शिवणी जा .येथील गटातील सर्व शेतकरी लाभार्थी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक श्री.शिवाजी भारती यांनी सर्व प्रकारचे कामगंध सापळे, निळे व पिवळे चिकट सापळे, पक्षी थांबे, दशपर्णी अर्क, अमिल अर्क, पाच



टक्के निंबोळी अर्क, लमीत अर्क, ब्रह्मास्त्र, जीवामृत आदी निविष्ठा निर्मिती बाबत प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली. त्याचबरोबर श्री.सोहेल सय्यद यांनी सेंद्रिय शेतीची संकल्पना,समुह,शेतकरी उत्पादक कंपनी निर्मिती, योजनेचे स्वरूप ,लाभार्थी अनुदान याविषयी सविस्तर माहिती दिली. यानंतर श्री. शिवाजी भारती यांनी शेतकऱ्यांच्या शंकेचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. रामेश्वर पवार यांनी केले. यानंतर जेवण व चहापाणी नंतर कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमाला शेद्रिय शेती करणारे शेतकरी महिला युवक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती..



# शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाला दिला अल्टिमेटम

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** जिल्हा परिषदेच्या माध्यामिक व प्राथमिक शिक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबित असून शासनाने हे प्रश्न सोडविण्यासाठी तात्काळ उपायोजना करावी अन्यथा महाराष्ट्र राज्य शिक्षकभारती राज्यभर आंदोलन करेल असा इशारा नवनाथ गेंड यांनी दिला.
शासनाने हे प्रश्न सोडविण्यासाठी काम करावे तरच शिक्षक बिनधास्त पणे शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी काम करण्यासाठी अजून तत्पर होतील, असे नवनाथ गेंड यांनी यावेळी सांगितले. खुल्ताबाद भक्त निवास येथे शिक्षकांच्या प्रश्नांबाबत सहविचार बैठक घेण्यात आली. राज्यध्याक्ष नवनाथ गेंड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रकाश दाणे, किशोर कदम, सुभाष महेर,संतोष ताठे, राजेश भुसारी, महेंद्र बारवाल,संजय बुचूड़े, मच्छिंद्र भराडे, शगुफ्ता फारूकी, सुष्मा खरे यांच्यासह शिक्षक भारतीचे पदाधिकारी उपस्थित होते.
वस्तीशाळा शिक्षकांची जुनी सेवा ग्राह धरून नियमित शिक्षकांचे लाभ घ्यावे, पदोन्नतीने केंद्रप्रमुख पदे तात्काळ भरावे, कोट्यवधी रुपयांची वैद्यकीय व इतर राजेचे व वेतन निश्चितीचे, देयक प्रलंबित असून शासनाने राज्यभर त्यासाठी वित्तलब्धी द्यावी, शिक्षकांचे अशैक्षणिक कामे कमी करावे, दरमहा शिक्षक संघटनांची शासनाने बैठक घेऊन त्या संदर्भात नियमित बैठकी साठी राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदला आदेशित करावे आदीसह विविध ठराव या बैठकीत घेण्यात आले.
बैठक यशस्वी करण्यासाठी शिक्षकभारती प्राथमिक विनोद पवार,नजीर पठाण,सुनील काळे, प्रशांत नरवाड़े, प्रवीण संसारे, नितीन पाटील, नितीन पवार,रमेश जाधव,विजय ढाकरे,संजय देव्हरे,सतीश नहिरे,बालाजी माने,रमेश दळे,पांडुरंग बाचकर, विजय चव्हाण,साहेबराव धनराज,नारायण श्रीखंडे, किशन चव्हाण, गणेश दाडेकर,रावसाहेब जंजाळ, पूनम चव्हाण,नवनाथ बडख, अजिनाथ बोडखे, पवन जाधव, शितल मिरगे, छाया मतकर, अरुणा वेताळ आदींसह शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कांदा निर्यातबंदी करणाऱ्यांविरोधात मतदान बंदी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** देवळा-चांदवड मतदार संघात समावेश असलेल्या आणि शेतकरी संघटनेचे बालेकिल्ला असलेल्या विठेवाडी, झिरेपिंपळ येथे मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर प्रहार शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गणेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली कांदा निर्यातबंदीमुळे सरकार विरूध्द फलक झळकावण्यात आले आहेत. ज्यांनी केली वारंवार शेतीमालाची निर्यात बंदी, त्यांना करु आता मतदान बंदी, असे आवाहन या फलकांव्दारे करण्यात आले आहे.

विठेवाडी आणि झिरेपिंपळ शिवारातील शेकडो कांदा उत्पादकांनी सत्ताधारी केंद्र व राज्य शासनाच्या शेतकरी विरोधी चुकीच्या धोरणाविरोधात रोष व्यक्त केला आहे. ज्यांनी केली वारंवार शेतीमालाची निर्यातबंदी, त्यांनाच आता मतदानबंदी, अशा घोषणा देत तशा आशयाचा फलक लोहणेर-कळवण या राज्यमार्गांवरील विठेवाडी येथील चौफुलीवर लावून निषेध व्यक्त करण्यात आला. सकाळी गावातील तरुणांनी भव्य फलक लावून त्याचे विधिवत पूजन केले. गावकऱ्यांनी फलकांसमोर जुन्या उन्हाळी कांद्याची पूजा करुन केंद्र सरकारला सदबुध्दी सुचावी म्हणून संक्रांतीनिमित्ताने प्रार्थना केली. ज्यांनी आमच्या शेतीमालावर निर्यातबंदी केली, त्यांना येत्या लोकसभा निवडणुकीत त्यांची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार यावेळी करण्यात आला. घोषणाबाजी करुन निर्यातबंदी करणाऱ्या केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला. शहरी भागातील मतदारांची मर्जी सांभाळण्यासाठी ग्रामीण भागातील कांदा उत्पादकांना वाऱ्यावर सोडले जात आहे. त्यामुळे संपूर्ण ताकदीसह विरोध करुन येणाऱ्या निवडणुकीत संघटित ताकद दाखवून दिली पाहिजे, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे समन्वयक कुबेर जाधव यांनी गावातील तरुण कांदा उत्पादकांना केले. यावेळी विठेवाडी, झिरेपिंपळ गावातील शेकडो कांदा उत्पादक तसेच राजा शिवछत्रपती तरुण मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी गावातील सामाजिक कार्यकर्ते निंबा निकम, प्रविण निकम यांच्या शिवप्रेमी मित्रमंडळाने लक्षवेधी फलक उभारला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष माणिक निकम, मिलिंद निकम, नंदकिशोर निकम, संजय निकम आदी उपस्थित होते.

# राज्यात थंडीचा कडाका वाढला

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उत्तरेकडील थंड वारे आता महाराष्ट्राच्या दिशेने वळले आहेत. त्यामुळे मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यासह अनेक ठिकाणी थंडीचा कडाका वाढला आहे. काही जिल्ह्यांमध्ये किमान तापमानाचा पारा दहा अंशापेक्षाही कमी आहे. तर दुसरीकडे भारतीय हवामान खात्याने काही राज्यांमध्ये पावसाचा नाही तर चक्क थंडी आणि धुक्याचा 'ऑरेंज' व 'रेड अलर्ट' जाहीर केला आहे.राज्यात थंडीचा कडाका वाढला आहे आणि किमान तापमान नऊ ते सोळा अंश सेल्सिअसच्या दरम्यान आहे. येत्या काही दिवसांत किमान तापमानात आणखी घट होण्याची आणि परिणामी गारठा वाढण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. विदर्भात मंगळवारपर्यंत उन्हाची चाहूल जाणवू लागली असतानाच आता बुधवारपासून पुन्हा आभाळी वातावरण आहे. तर बोचरे आणि गार वारे जाणवत आहे. उत्तरेकडील राज्यांमध्येही किमान तापमानात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. त्यामुळे या राज्यांसह देशातील अनेक भागांत आता थंडीचा जोर वाढला आहे.

पुढील काही दिवसही थंडीची लाट कायम राहणार असून भारतीय हवामान खात्याने अनेक राज्यांना पावसाचा नाही तर थंडी आणि धुक्यांचा 'ऑरेंज' व 'रेड अलर्ट' जाहीर केला आहे. दरम्यान वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे देशातील हवामानात येत्या काही दिवसांत बदलदेखील पाहायला मिळू शकतात, मध्यप्रदेशातदेखील किमान तापमानाचा पारा मंगळवारी ३.६ अंश सेल्सिअसवर पोहोचला. अनेक ठिकाणी ते चार ते पाच अंश सेल्सिअससुद्धा नोंदवण्यात आले. या राज्यातसुद्धा धुक्यांमुळे दृष्यमानता कमी झाली आहे.

# बारावीच्या विद्यार्थ्यांना देणार राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे धडे

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत प्रशिक्षकांचे सोमनाथ येथे प्रशिक्षण संपन्न

आधुनिक केसरी न्यूज



**गडचिरोली :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची विद्यार्थी आणि शिक्षकांना योग्य माहिती व्हावी, या धोरणाबाबत त्यांच्या मनात असलेल्या प्रश्नांची उकल व्हावी यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी गोंडवाना विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांना या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची माहिती देणार आहे. यासाठी जिल्ह्यातील प्रशिक्षकांची निवड करण्यात आली आहे. प्रशिक्षकांचे एकदिवसीय प्रशिक्षण नुकतेच चंद्रपूर जिल्ह्यातील सोमनाथ येथे पार पडले. या प्रशिक्षणाचे उद्‌घाटन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी केले. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रमौली, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्राध्यापक उपस्थित होते.
यावेळी बोलताना आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी म्हणाले की, बारावी नंतर काय ? असा प्रश्न अनेक विद्यार्थ्यांच्या मनात असतो. पुढे पदवीच्या प्रथम वर्षात येऊन विद्यार्थी संभ्रमात असतात की आता काय करायचे?, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणणानुसार पुढचे शिक्षण होणार आहे म्हणजे नक्की काय होणार आहे, याबाबत त्यांच्या मनात स्पष्टता नाही. हीच स्पष्टता आणून देणे हा उद्देश गोंडवाना विद्यापीठाचा आहे.
यासाठीच विद्यापीठ आणि सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील काही शिक्षकांना प्रशिक्षण देऊन त्यांना इतर महाविद्यालयातील विद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, यासाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. सध्या मान्यताप्राप्त महाविद्यालयातील २० टक्के विद्यार्थी कमी झाले आहेत. अनेक विद्यार्थी बारावीनंतर शिक्षण सोडून देतात तर काही विद्यार्थी इतर जिल्ह्यात जातात. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थी पुढचे शिक्षण कसे घेतील आणि तेही आपल्याचं जिल्ह्यात यासाठी प्रयत्न केले पाहिजे. गोंडवाना विद्यापीठाच्या परीक्षेत्रात येणाऱ्या विद्यार्थ्यांना जर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजून सांगितले तर विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. रोजगाराचे स्वरूप बदलत आहे, हे विद्यार्थ्यांना सांगावे लागेल. एका विशिष्ट जॉबच्या मागे न लागता आऊट ऑफ बॉक्स शोधावे लागेल.
हळूहळू त्याचा कल सामाजिक उद्योजकाकडे न्यायला पाहिजे त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. याचे मार्गदर्शन या प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळेल. सोबतच 'विकसित भारत २०४७' ही केंद्र शासनाची संकल्पना आहे. २०४७ मध्ये भारत जगात पाहिल्या क्रमांकाचा देश व्हावा, यासाठी सुद्धा या विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे नेपच्या माध्यमातून हे शक्य करण्यासाठी प्रयत्न केला जात असल्याचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी सांगितले.
यावेळी अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात माहिती दिली. प्र-कुलगुरू डॉ.श्रीराम कावळे यांनी सांगितले की, नेप च्या अंमलबजावणी संदर्भात गोंडवाना विद्यापीठ इतर विद्यापीठाच्या पुढे आहे. दोन्ही जिल्ह्यातील बारावीच्या विद्यार्थ्यांना नेपच्या माध्यमातून मार्गदर्शन करणे हा मुख्य उद्देश आहे. सर्वांनीमिळून यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# अबॅकस स्पर्धेचे बक्षीस वितरण; उबाळे शिक्षक दांपत्याचे मान्यवरांकडून विशेष कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**
लोणंद : दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी ब्रेन ट्रेन एज्युकेशन फाउंडेशन नाशिक व नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ वेदिक मॅथ्स अबॅकस मार्फत राज्यस्तरीय अबॅकस मॅथ मॅरेथॉन ऑनलाइन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत निरा सह पंचक्रोशीतील विद्यार्थी सहभागी झाले होते.प्रतिक उबाळे अबॅकस व रेगुलर क्लासेसच्या संचालिका प्रतिभा उबाळे व सोमनाथ उबाळे ह्या शिक्षक दांपत्याच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी चांगली तयारी करून घेतलेली असून या परीक्षेसाठी १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता.सर्व विद्यार्थ्यांनी यश मिळविले होते. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करण्यासाठी निरा ता.पुरंदर येथील ग्रामपंचायत येथे विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण समारंभ कार्यक्रम सोमवार दिनांक १५ जानेवारी आयोजित करण्यात आला होता. प्रतिक उबाळे अबॅकस व रेगुलर क्लासेसच्या संचालिका प्रतिभा उबाळे व सोमनाथ उबाळे यांच्या अथक परिश्रमातून निरा व पंचक्रोशीतील विद्यार्थी घडत असल्याने एक चांगले शैक्षणिक कार्य केले या दोन्ही शिक्षक दांपत्याकडून केले जात असल्याने या कार्याबद्दल मान्यवरांकडून सुद्धा विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी उपसरपंच राजेश काकडे,सदस्य अनिल चव्हाण,प्रमोद काकडे, सुनील चव्हाण, अभिषेक भालेराव,अमोल साबळे,मुख्याध्यापक पवार सर,सचिन मोरे,दयानंद चव्हाण, संतोष मोहिते,सुनील जाधव व इतर मान्यवर उपस्थित होते.विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि मेडल वाटप करण्यापूर्वी मान्यवरांनी मनोगते व्यक्त करत सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.शिवाय विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.राजेश काकडे,अनिल चव्हाण,सचिन मोरे,दयानंद चव्हाण आदींनी मनोगते व्यक्त केली.तद्‌नंतर मान्यवरांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.मान्यवरांना भारतीय संविधानाची प्रास्ताविक प्रत आणि धम्मपद पुस्तिका देण्यात आली.स्पर्धेमध्ये निरा पंचक्रोशीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नीरा नंबर १ व २ मुले,मुली, शिवतक्रारवाडी,गुळूंचे,निंबुत,पाडे गाव, बाळूपाटलाचीवाडी,लोणंद,धायगुडे मळा या गावातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.आपल्या पाल्याचा कौतुक सोहळा पाहण्यासाठी पालकवर्गाने सुध्दा हजेरी लावली हौती.त्यामुळे हा कौतुक सोहळा टाळ्यांच्या प्रतिसादाने अधिक प्रेरणादायी आणि आनंददायी असा संपन्न करण्यात आला.





# शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करा, अन्यथा रेल्वे रोखणार!

## शेतकरी नेते रविकांत तुपकरांनी सरकारला ठणकावले

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलढाणा :** येलो मोझॅक, बोंडअळी, दुष्काळाची मदत व सोयाबीन-कापसाला दरवाढ या मागण्यांसाठी गेल्या ऑक्टोबर महिन्यापासून सोयाबीन कापूस उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरलेला आहे. सरकार मात्र शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेत नाही. सत्तेच्या धुंदीत मश्गुल असणारे मुख्यमंत्री महोदय राज्यभर पक्षाचे दौरे करत आहेत, पण सोयाबीन-कापूस दरवाढीसाठी दिल्ली दरबारी जायला त्यांना वेळ नाही. नुसतीच नुकसानभरपाईची घोषणा केली. पण एक रुपया नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या जमा झाली नाही. त्यामुळे आता शेतकऱ्यांचा संयम सुटत चाललेला आहे. तेव्हा सरकारने १८ जानेवारीपर्यंत आमच्या मागण्यांवर अंमलबजावणी करावी, अन्यथा १९ जानेवारीला सकाळी ६ वाजल्यापासून मलकापूर रेल्वे स्टेशनवरून दिल्ली, गुजरात आणि मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या सर्व रेल्वेगाड्या अडवल्या जातील, असा खणखणीत इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी राज्यातील आदर्शगाव असलेले मिसाळवाडी (ता. चिखली) येथून दिला. मिसाळवाडीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्यावतीने तुपकर यांचा जाहीर सत्कार व परिवर्तन सभा आयोजित करण्यात आली होती. एका छोट्याशा खेड्यात या निमित्ताने विराट गर्दीची शनिवारी रात्री सभा पार पडली. या सभेतून तुपकर बोलत होते. याप्रसंगी मिसाळवाडी ग्रामस्थांच्यावतीने तुपकरांना तब्बल एक लाख रूपयांचा निधी त्यांच्या लोकसभा निवडणुकीच्या खर्चापोटी देत, शेतकरी चळवळीला अर्थसहाय्य देऊन आपला खारीचा वाटा उचलला. प्रारंभी गावातील तरूणाईने रविकांत तुपकरांचे गावात आगमनप्रसंगी जेसीबीतून पुष्पवृष्टी करत, तसेच त्यांना खांद्यावर उचलून घेत जल्लोषात स्वागत केले. याप्रसंगी शिक्षणमहर्षि तथा या भागातील ज्येष्ठ नेते शेणफडराव घुबे, प्रकाश आबा पाटील, इसरूळचे सरपंच सतीश पाटील भुतेकर, कोनडचे सरपंच अजाबराव जावळे, ज्येष्ठ शेतकरी नेते भानुदास पाटील घुबे, वरिष्ठ पत्रकार तथा संपादक पुरूषोत्तम सांगळे, चिखली बाजार समितीचे संचालक श्रीकृष्ण मिसाळ, शेतकरी नेते विनायक सरनाईक, युवा शेतकरी नेते राजू पाटील भुतेकर, पिंपळवाडीचे युवा नेते राहुल मिसाळ, शेनफड पाटील सुरूशे, खामगावातील आक्रमक आंदोलनामुळे चर्चेत आलेले शेतकरी रवी महानकार, दीपक घुबे, पत्रकार भिकनराव भुतेकर, नितीन राजपूत, भगवान मोरे, भारत वाघमारे, बबनराव चेके, रामेश्वर अंभोरे, दत्तात्रय जेऊघाले, गजानन घुबे, भगवान परिहार, राजूभाऊ मिसाळ, मिसाळवाडीचे सरपंच बाळू पाटील, उपसरपंच हनुमान मिसाळ, माजी सरपंच देवीदास मिसाळ, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तथा प्रभावी वक्ते शिवश्री प्रवीण मिसाळ, पोलिस पाटील रवी पाटील मिसाळ, सुनील मिसाळ, गजानन मिसाळ, किशोर सुरडकर, संतोष भगत, अनिल काकडे, ज्ञानेश्वर बुरकूल यांच्यासह पिंपळवाडी, कोनड, अमोना, शेळगाव आटोळ, इसरूळ, मंगरूळ, अंचरवाडी, भरोसा येथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध पदाधिकारी यांच्यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी ज्येष्ठ नेते शेणफडराव घुबे यांनी सरकारवर टीका करत, शेतकऱ्यांसाठी लढणारे नेतृत्व आता लोकसभेत जाणं गरजेचे आहे. यापूर्वी ज्यांना लोकसभेत पाठवलं, त्यांनी शेतकरीहितासाठी काहीच केले नाही, तसेच जिल्ह्यासाठीही गेल्या पंधरा वर्षात काही केले नाही. या भागातील सिंचन, पाण्याचे, शेतीचे प्रश्न भरतभाऊ बोंद्रे यांच्यामुळेच मार्गी लागले, इतर फक्त श्रेय लाटण्याचे काम करत आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# बबलू कराळे नवोपक्रमशील शिक्षक पुरस्काराने सन्मानित



आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा 2023 -24 मध्ये ISO जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा,पंचायत समिती अचलपूर येथील आदर्श शिक्षक बबलू विनायकराव कराळे यांना विभागीय कार्यालय डायट अमरावती तर्फे नवोपक्रमशील शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी सादर केलेल्या नवोपक्रमाला चौथा क्रमांक मिळालेला आहे. बबलू कराळे यांना डायट अमरावती, प्राचार्य डॉ. मिलिंद कुबडे, डॉ.विजय शिंदे, अकोला शिक्षणाधिकारी माध्यमिक पाटेकर मॅडम, डॉ. क्षत्रिय सर, अधिव्याख्याता चांदोरे सर, अधिव्याख्याता सोनवणे सर यांच्या हस्ते उपक्रमशील शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यानिमित्ताने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# शिरवळच्या ग्लोरी स्कूलचे क्रिकेटमध्ये यश

## जिल्हास्तरीय स्पर्धेत मिळविला प्रथम क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** जिल्हास्तरीय टेनिस बॉल क्रीडा स्पर्धा दहिवडी येथे जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या वतीने घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेतून १५ जानेवारी २०२४ रोजी शिरवळ ता.खंडाळा येथील ग्लोरी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाला गवसणी घालणारे यश मिळविले आहे.या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे व शाळेचे खूप कौतुक होऊ लागले आहे.१७ वर्षाखालील गटातून टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत ग्लोरी इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यात आला होता.मैदानात चमकदार अशी कामगिरी केल्याने त्यांनी प्रथम क्रमांक पटकावलेला असून या शाळेतील विद्यार्थ्यांची निवड विभागीय स्पर्धेसाठी करण्यात आलेली आहे.खेळात कर्णधार म्हणून हिमांशू चव्हाण,उपकर्णधार प्रथमेश जाधव, उत्कृष्ट गोलंदाजी साहिल जाधव,प्रणव टकले यांनी केली. तसेच प्रणव टकले,प्रथमेश जाधव ,प्रथमेश देशमुख,लोकेश पुरोहित,अकिब खान, तनिष भरगुडे,पियूष भांडे,सिद्धेश शिंदे,साहिल जाधव,अथर्व मांढरे यांनी अचूक कामगिरी करून यश संपादन केले.क्रीडा शिक्षक किरण कृष्णा खोपडे यांचे खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल शाळेचे संस्थापक जितेंद्र भणगे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेच्या उपप्राचार्य वैशाली भणगे यांनी विभागीय स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना खूप शुभेच्छा दिल्या. पालकवर्गातून विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन केले जात आहे.शाळेकडून विद्यार्थ्यांना शालेय स्पर्धेत खेळण्यासाठी वाव दिला जात आहे.त्यांना प्रोत्साहन दिले जात आहे.शिरवळ सह पंचक्रोशीतील ग्रामस्थ तसेच शिक्षण क्षेत्रातील लोकांकडून शाळेचे सुद्धा कौतुक केले जात आहे.विविध शालेय उपक्रमामध्ये ग्लोरी इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी सहभागीच होत नाहीत.तर चांगले यश मिळवित आहेत.कला क्रीडा,शिक्षण विज्ञान सामाजिक उपक्रम यात मिळवत असलेल्या यशा मुळे आज ग्लोरी स्कूलचा उपक्रमशिल शाळा असा नामोल्लेख केला जात आहे.ग्लोरी स्कूल मधील विद्यार्थी शाळेच्या यशात दिवसेंदिवस भरच टाकत आहे.शैक्षणिक क्षेत्रातून विद्यार्थी घडविण्यासाठी आम्ही नेहमी प्रयत्नशील राहणार आहोत.



# कनकशीळ शाळेत बातमीपत्राच्या माध्यमातून अभिनव अभ्यासक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील उपक्रमशील शाळेचे जिल्हा पारितोषिक मिळवणाऱ्या कनकशीळ शाळेत, बातमीपत्राच्या माध्यमातून अनोख्या पद्धतीने विद्यार्थ्यांना अभ्यास दिला जात आहे. विद्यार्थी बातम्या बघत नाहीत आणि अभ्यासामध्येही खंड असतो. डोंगराच्या कुशीत वसलेले कनकशिळ एक छोटेसे गाव. या गावात सध्या बातमीपत्र ही येत नाही. तसेच विद्यार्थी टीव्हीवरील मालिका व चित्रपट बघतात , परंतु न्यूज बघत नाही. ही समस्या गावातील शिक्षक विशाल टिप्रमवार यांनी शोधल्या. या समस्येवर काय उपाय करता येईल या विचारातून जर विद्यार्थ्यांचेच एक बातमीपत्र बनवले आणि त्यातून अभ्यास दिला तर मुलांच्या अभ्यासाची सुद्धा सोय होईल आणि मुलांना प्रेरणा मिळून बातमी बघण्याची सवय सुद्धा लागेल. असा उद्देश ठेवून त्यांनी शाळेत बातमीपत्र सुरू केले. शाळेतच न्यूज रूम स्थापन केली. ग्रीन स्क्रीन, कराओके माईक, थ्रीडी विआर बॉक्स , ओमनी कॉर्डियल माईक , टेलीप्रॉम्प्टर, टॅबलेट व एडिटिंग सॉफ्टवेअर च्या माध्यमातून तसेच इतर तंत्रज्ञान विषयक साहित्य स्वखर्चाने निर्माण केले. शाळेतील विद्यार्थी स्वतः बातमीपत्र बनवतात व शिक्षक एडिटिंग करून शाळेच्या समूहात प्रसारित करतात. सरांनी तयार केलेल्या या बातम्यांमध्ये इंग्रजी वाक्य वाचन, मराठी गती वाचन, शाळेतील उपक्रमांची माहिती, शाळेतील स्पर्धांना बक्षिसे , पालक सूचना व शेती मार्गदर्शन इत्यादी विभाग करण्यात आले आहे. याद्वारे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला गती मिळाली आहे आणि दर पंधरा दिवसानंतर बातम्या देणाऱ्या न्यूज अँकर ची टीम बदलत असते . त्यामुळे पुढच्या वेळी आपल्याला संधी मिळावी म्हणून विद्यार्थी बातम्या बघायला लागले आहेत. सरांनी सुरू केलेल्या या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी वाढीस लागत आहे. तसेच उपस्थितीचे प्रमाणही वाढले आहे. गावकऱ्यांसाठी संदेशही या बातमीपत्रातून प्रसारित केले जातात. शाळेतच चित्रीकरणाची सोय असलेली छत्रपती संभाजी नगर मधील कनकशीळ पहिलीच शाळा ठरली आहे. विशाल टिप्रमवार सरांचा हा उपक्रम गावकऱ्यांसाठी औत्सुक्याचा विषय आणि बऱ्याच इतर शाळांसाठीही आदर्श ठरणार आहे.

जिल्हा परिषद शाळा टिकविण्यासाठी समस्या शोधून त्यावर उपाययोजना करणे व विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही बनवून आधुनिक शिक्षण देणे , ही स्पर्धात्मक युगात महत्त्वाची गरज असल्याचे प्रतिपादन विशाल टिप्रमवार यांनी केले. सरांच्या या अभिनव उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक अप्पाराव नलावडे तसेच सहशिक्षक प्रभाकर गायकवाड , नारायण काळे ,मनोज शेळके, सोहन सातदिवे, रवी शिखरे यांच्यासह गावाचे सरपंच संदीप निकम , अध्यक्ष ज्ञानेश्वर तांगडे उपाध्यक्ष अंबादास पवार यांच्यासह संपूर्ण शाळा व्यवस्थापन समितीने अभिनंदन केले आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# राष्ट्रीय बंधुता निमंत्रितांचे काव्यसंमेलन व पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद पुणे आणि रयत शिक्षणसंस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध यांच्यावतीने राष्ट्रीय बंधुता निमंत्रितांचे काव्यसंमेलन व पुरस्कार वितरण सोहळा १२ .१ .२०२४ रोजी एस. एम. जोशी सभागृह पुणे येथे मोठ्या दिमाखात पार पडले. हे २५ व संमेलन होतं म्हणजे सुवर्णमहोत्सव. श्रीमती कल्पना दिलीप मापूसकर, मीरारोड, ठाणे ह्याना समारंभात "बंधुता शब्दक्रांती साहित्य" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांचा "कल्पदीप" हा काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित झाला झाला आहे. हुंडा, महागाई, गरिबी, स्त्रीभ्रूण हत्या, वेश्या, बाल कामगार, वृद्धाश्रम, डिप्रेशन, हरवलेली माणसे इ. सामाजिक विषयाला वाचा फोडणारे त्यांचे लेखन असते. दिवाळी अंक व विविध दैनिक, साप्ताहिक, मासिकातून त्याचे अव्याहत लेखन चालू असते.

# बाललैंगिक अत्याचार; दोघाविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील सईद नगर भागातील अल्पवयीन मुलीचा रस्ता अडवून तिचा हात धरून माझ्याशी लग्न कर नाहीतर तुझ्यावर ऍसिड टाकतो अशी धमकी दिल्याने सोमवारी ( ता. १५ )बाल लैंगिक अत्याचार कायदा अंतर्गत दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीसाकडुन मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील सईद नगर वसाहतीत १५ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा सोमवारी दुपारी साडेबारा वाजताच्या दरम्यान हात धरून रस्ता अडवून, तू माझ्याशी लग्न कर नाहीतर तुझ्यावर ऍसिड टाकतो असे धमकी देण्यात आल्याने आरोपी मोहम्मद आयास मोहम्मद गयासोदिन व आरोपीस मदत करणारे गया सुदिन यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलीस प्रशासनाच्या निझामकालीन वसाहतीकडे कोणी लक्ष देणार का?

## धर्माबादच्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना हक्काची घरे मिळतील का ?

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** संयुक्त महाराष्ट्राची निर्मितीला ६० वर्ष झाली, धर्माबाद तालुका निर्मिती होऊन वीस वर्षांपेक्षा अधिकचा काळ लोटला तरीही धर्माबाद पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या नशिबी मात्र निझामकालीन मोडकळीला आलेली इमारतच आहे. तालुका निर्मिती झाल्यावर या तालुक्याला आत्याधुनिक सेवा सुविधा असेलेले कार्यालय, निवास व्यवस्था मिळेल ही अपेक्षा होती. मात्र लोकांचा अपेक्षाभंग होत आहे. धर्माबाद तालुका पोलीस स्टेशन अंतर्गत ४९ गावे असून करखेली येथे उप पोलीस स्टेशन कार्यालय आहे. धर्माबाद पोलीस स्टेशनला एक पोलीस निरीक्षक, दोन पोलीस सहायक निरीक्षक,तीन पोलीस उप निरीक्षक आणि ६३ पोलीस शिपाई असा फौजफाटा आहे. मोठ्या संख्येने असलेल्या फौजफाट्यासाठी केवळ सोळा कर्मचाऱ्यांची पोलीस कॉर्टर पोलीस स्टेशनच्या पाठीमागे आहे. मात्र ही वसाहत निझामकालीन असल्याचे सांगितले जाते.

ह्या इमारतीतील खोल्या केवळ वन रूम वन किचन असे आहेत. बेडरूम केवळ दहा बाय दहा आकाराचे आहे. जगातील सामान्य माणसांच्या जीवन शैलीत अमूलाग्र बदल होत आहे.पोलीस प्रशासनाची वेता मात्र जैसे थे वैसे आहे.एक मुलगा मुलगी असे छोटे कुटुंब असले तरी किमान वन.बीएच के फ्लॅट तरी असावा अशी किमान अपेक्षा असते. जेणे करून मुलाना अभ्यासाची सोय होईल. नातेवाईक, मित्र आले तर बसता तरी येईल असे व्यवस्था राहिली पाहिजे. परंतु धर्माबाद पोलीस स्टेशनचे कॉर्टर कोणत्याही सोयी सुविधा नसेलेले आकूड आहेत. त्यामुळे या वसाहतीत केवळ सात कर्मचारी राहतात अशी माहिती प्राप्त झाली आहे. उर्वरित सर्व अधिकारी व कर्मचारी भाड्याच्या घरात राहतात. पोलीस सेवा ही अत्यावश्यक सेवेत मोडले जाते . ह्यामुळे कधीही, केंव्हाही त्यांना अलर्ट राहावे लागते. जर त्यांना सर्व सोयीनी युक्त, प्रशस्त असे पोलीस स्टेशन जवळ शासकीय वसाहत मिळाल्यास त्यांच्या कार्यक्षमतेत निश्चित वाढ होईल असे मानले जाते. या इमारतीवर दोन ते तीन वर्षां पूर्वी ४७ लाख रुपये खर्च करून डागडुजी केली आहे. खरे तर या महागाई च्या युगात ४७ लाख रुपयात एक घर सुद्धा शहरात मिळत नाही.तेवढ्या पैशात इथे पूर्ण सोळा खोल्यांची डागडुजी करण्यात आली. त्यातही योग्य रीतीने खर्च करण्यात आलेलं नसल्यामुळे येरे माझ्या मागल्या अशी या इमारतीची स्थिती झाल्याच काही लोकांचा सूर आहे. धर्माबाद शहरात अनेक ठिकाणी शासकीय भूखंड त्या जागेवर प्रशस्त पोलीस वसाहत बांधली जावी अशी लोकांची धारणा आहे.

> धर्माबाद शहरातील राजकीय नेते व आमदार खासदार नेते मंडळी या वसाहत कडे लक्ष देतील का जवळ पास वीस ते पंचवीस वर्ष ही वसाहत जीर्ण अवस्थेत आहे .अधिकारी व कर्मचारी त्यांचे परिवार जीर्ण वसाहतमध्ये जीव मुटीत ठेऊन संसाराचा गाडा चालवत आहेत . अत्यावश्यक सेवा देणाऱ्या अश्या पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांची परिस्थिती खुप निदनीय आहे .खरेच जीर्ण वसाहतकडे राजकीय सामाजिक कार्यकर्ते पुढारी जीर्ण वसाहतकडे लक्ष देण्याची गरज आहे .



# नवोदय परीक्षा कॉपीमुक्त घेण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** यावर्षी 20 जानेवारीपासून नवोदय परीक्षेत सुरुवात होत आहे. ग्रामीण भागातील मुलांची गुणवत्तेच्या आधारावर निवड करून दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना मुख्यप्रवाहात आणणे हा त्यामागचा उद्देश आहे. परंतु मागील काही वर्षापासून नवोदय परीक्षा ही ढिसाळ पद्धतीने होत असल्याच्या तक्रारी वारंवार येत आहे. वशिलेबाजी तसेच नक्कल करून विद्यार्थी पात्र केले जात असल्याचा आरोपही होत आहे. त्यामुळे सामान्य पालकांच्या मनात नवोदय परीक्षा निवड प्रक्रिया संदर्भात प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.ग्रामीण भागातील अभ्यासू विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही परीक्षा अत्यंत महत्त्वाची आहे.

म्हणून सदरील परीक्षा कॉपीमुक्त व्हावी असे मागणी रुद्राणी फाऊंडेशनचे अध्यक्ष भीमाशंकर दारुवाले यांनी शिक्षण विभागाकडे केली आहे. ही परीक्षा एमपीएससीच्या धर्तीवर घेण्यात यावी.अधिकारी व कर्मचारी यांची संख्या वाढवावी.परीक्षा दालनात मोबाईल वापरण्यास बंदी करावी. जेणेकरून परीक्षेत होणाऱ्या अनुचित प्रकारस आळा बसेल. सदरील परीक्षेला पोलीस बंदोबस्त द्यावा .तसेच ही परीक्षा सीसीटीव्हीच्या निगराणी खाली घ्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# अजीम नवाज राही यांना हंबर्डे साहित्य पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** आष्टी तालुका शिक्षण प्रसारक



मंडळ संचलित एडवोकेट बी डी हंबर्डे महाविद्यालय आणि भाऊ फाउंडेशन आष्टी जिल्हा बीड यांच्या संयुक्त विद्यमानाने संस्थापक अध्यक्ष कै. बन्सीधर धोंडूबाप्पू हंबर्डे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२३ २०२४ चे - राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे.यामध्ये साखरखेर्डा येथील प्रख्यात, साहित्यिक नामवंत निवेदक अजीम नवाज राही यांना सुद्धा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याचबरोबर कवियत्री सिसिलिया कार्व्हलो यांना सुद्धा साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे.सिंदखेडराजा तालुक्यातील आडवळणी असलेल्या साखरखेर्डा येथील प्रख्यात कवी नामवंत निवेदक नवाज राही यांना अगोदर सुद्धा अनेक पुरस्कार प्राप्त झाली आहेत साखरखेर्डा गावचं नाव त्यांनी संपूर्ण आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकवली आहे. सूत्रसंचालन करत असताना श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारी वाणी व असंख्य शब्द त्यांच्याकडे उपलब्ध असतात संघर्षातून जीवन जगत कवी अजीम नमाज राही यांचा प्रवास सर्वांना माहीत आहे या अगोदर सुद्धा त्यांना व्यवहाराचा काळा घोडा,कल्लोळातला एकांत ही त्यांची पुस्तके संपूर्ण महाराष्ट्रभर गाजली त्यांना कवी केशवसुत पुरस्कार,यशवंतराव चव्हाण पुरस्कार,मानाचा महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार असे विविध पुरस्कार त्यांना मिळालेले आहे.मुस्लिम असून सुद्धा मराठी भाषेवर असलेलं प्रभुत्व ही त्यांचे जमेची बाजू आहे तसेच उर्दू भाषेवर सुद्धा कवी राही यांचे प्रभुत्व आहे.कवी अजीम नवाज राही यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# हसदेव जंगल वृक्षतोड थांबविण्याची राज्यपालांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** छत्तीसगड राज्यातील हसदेव जंगलाची होणारी वृक्षतोड थांबवावी यासाठी जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून राज्यपाल यांना महाराष्ट्र प्रदेश आदिवासी कॉंग्रेस यांच्यातर्फे निवेदन देण्यात आले.

छत्तीसगड राज्यातील सरगुणा जिल्हयातील उदयपूर परिसरातील घाटबन्याच्या पेट्रोमार जंगल हा आदिवासी चे देवस्थान हसदेव जंगलाचा परिसर आहे. भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसुचीमध्ये हे जंगल जैवविवीधनेत नटलेले आहे. या परिसरात कोळसा मुबलक प्रमाणात मिळत असल्यामुळे जंगलातील ९२ हेक्टर क्षेत्रात उद्योजक गौतम अदामी यांना कोळखा उत्खननासाठी बेकायदेशीर रित्या परवानगी दिले असुन ४५० पेक्षा जास्त जवान हसदेव जंगलात तैनात यंत्राद्वारे जंगलतोड केली जात ती त्वरित थांबवावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य आदिवासी कॉंग्रेस सेल धुळे जिल्हा पदाधिकारी यांच्या तर्फे करण्यात आली तसेच धुळे जिल्हयासह महाराष्ट्र राज्यासह तीव्र स्वरुपात निषेध व्यक्त करण्यात आला सदर जंगल तोड न थांबल्यास तीव्र स्वरुपात जन आंदोलन महाराष्ट्र राज्य भर उभे करण्याचा इशारा या ठिकाणी देण्यात आला.

# राहेरी बु. येथील नामविस्तार सोहळ्यात राडा

## प्रा. कवाडे यांचा वंचित बहुजन आघाडीकडून निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलढाणा :** १५ जानेवारी रोजी सिंदखेडराजा तालुक्यातील राहुरी बुद्रुक येथील नामविस्तार सोहळ्याच्या कार्यक्रमांमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्याकडून प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली, दरवर्षीप्रमाणे १५ जानेवारीला राहिली बुद्रुक येथील प्राध्यापक जोगेंद्र कवाडे यांचा नामविस्तार सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतो ,या कार्यक्रमाला प्राध्यापक कवाडे न चुकता दरवर्षी येऊन सभा घेत असतात,परंतु यावर्षी वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष मधुकर शिंदे यांच्यासह 100 कार्यकर्त्यांचा जमाव सभेदरम्यान उपस्थित होता त्यांनी एकदम घोषणाबाजीला सुरुवात केली,प्राध्यापक जोगेंद्र कवाडे यांचा निषेध असो जातीवादी आ. गायकवाड यांचा निषेध असो, अशा प्रकारच्या घोषणाबाजी करण्यात आले, त्यानंतर वातावरण चिघळू नये म्हणून पोलिसांनी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष मधुकर शिंदे तसेच कार्यकर्त्यांना स्थानबद्ध केले,व कार्यक्रम संपल्यानंतर त्यांना सोडून दिले.

यासंदर्भामध्ये मधुकर शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधतांना त्यांना म्हटले आहे की प्राध्यापक जोगेंद्र कवाडे गेल्या 25 ते 30 वर्षापासून या ठिकाणी येऊन फक्त सभा घेत असतात त्यांनी राहिली बुद्रुक येथील ऐतिहासिक कार्यक्रम स्थळे कुठल्याही प्रकारची सुविधा उपलब्ध करून दिली नाही,लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध नसते त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये मेलेले जनावर टाकले जातात घाण कचरा त्या ठिकाणी टाकलेला जातो, नाम विस्तार दिन हा समस्त बौद्ध बांधवांनी पुकारलेला एल्गार होता आवाज होता. परंतु प्राध्यापक कवाडे हे जातीवादी लोकांना कार्यक्रमाला आमंत्रित करतात म्हणून आम्ही त्यांचा निषेध व्यक्त केला असे सुद्धा वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष मधुकर शिंदे यांनी सांगितले ,पुढील वर्षी यापेक्षाही तीव्र विरोध करू असे सुद्धा शिंदे यांनी सांगितले.

# करमाड येथे श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या सिद्ध पादुका दर्शन सोहळ्याची जय्यत तयारी



आधुनिक केसरी न्यूज

**करमाड :** प्रभू श्रीराम मंदिर लोकार्पण सोहळ्याच्या शुभ मुहूर्तावर जगतगुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य जी महाराज यांच्या पवित्र सिद्ध पादुका दर्शन सोहळ्याची पूर्वतयारी जोरात सुरू आहे. जगद्गुरू श्री स्वामी नरेन्द्राचार्य महाराज यांच्या सिद्ध पादुका दर्शन सोहळा दिनांक 22 जानेवारी रोजी करमाड येथे सुराणा पेट्रोल पंप (जालना रोड) जवळील भव्य मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. त्यासाठी जय्यत तयारी सुरू असून भव्य मंडप व व्यासपीठ उभारणीचे काम जलद गतीने आहोरात्र सुरू आहे.

या सोहळ्याला जिल्हाभरातील लाखो भाविकांची उपस्थिती लाभणार आहे. या ठिकाणी जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज यांच्या सिद्ध पादुका दर्शन सोहळ्यासह,उपासक दीक्षा, सामूहिक गुरुपुजन, आणि प्रवचन असे या कार्यक्रमाचे स्वरूप असणार आहे. उपासक दीक्षा घेण्यासाठी नोंदणी सुरू असल्याची माहिती जिल्हा निरीक्षक संदीप थोरात आणि जिल्हा आध्यक्ष साहेबराव आहेर यांनी दिली. या कार्यक्रमाला जवळ जवळ एक लाख भाविक उपस्थित असणार असे जिल्हा कमिटी चे म्हणणे आहे. यासाठी जिल्हा निरीक्षक संदीप थोरात, जिल्हा अध्यक्ष साहेबराव आहेर, महिला जिल्हाध्यक्ष निर्मला ताई सह सर्व जिल्हा व पूर्व ग्रामीण तालुका कमेटी भक्त साधक शिष्य उपासक यांनी पुढाकार घेतला आहे. तसेच सदरील कार्यक्रमास संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व साधक,शिष्य भक्तगण हितचिंतक यांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा कमिटीतर्फे करण्यात येत आहे.




## राजूर येथे नामविस्तार दिन मोठ्या उत्साहात साजरा; हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा 30 वा नामविस्तार दिन रविवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. छत्रपती संभाजी नगर येथील मराठवाडा विद्यापीठाचा 14 जानेवारी 1994 रोजी नामविस्तार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नाव विद्यापीठास देण्यात आले होते. तेव्हापासून 14 जानेवारी हा दिवस नाविस्तार दिन म्हणून साजरा केला जातो. लढ्यात शहीद झालेले हुतात्म्यांना राजूर येथे श्रद्धांजली वाहण्यात आली.याप्रसंगी अनेक मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नागरिक गुलाबराव मगरे, सरपंच भाऊसाहेब भुजंग,ग्रामविकास अधिकारी प्रमोद पुंगळे,जिल्हा परिषद सदस्य कैलास पुंगळे, प्रा. तातेराव अंभोरे, संतोष मगरे, मुख्याध्यापक रमेश राऊत, सोपान जावळे, माजी सभापती भाऊसाहेब काकडे, संदिप साळवे, गंगाधर आदमाने, उपसरपंच जिजाबाई मगरे, अशोक मगरे,अमोल साबळे, मनोज जाधव,दादाराव मगरे, दिगंबर मगरे, संभाजी बोर्डे, संजय साबळे ,संदीप पवार, नामदेव बनसोडे, गौतम रगडे, पद्माकर चंदनशिवे, श्याम नावकर, भगवान रगडे, कैलास वाकेकर, विशाल खरात, रवि परकरे, सुदाकर खरात, आरोग्य कर्मचारी दगडू रगडे, दिपक दाभाडे, अण्णा साबळे, गजानन आठवले, प्रदिप गंगावणे, भगवान नावकर , दिपक सोनवणे ,भिमराव मगरे, मिलिद मगरे, कृष्णा मगरे, संगीता मगरे, मंडाबाई सोनवणे, सविता मगरे, साखराबाई दाभाडे, ताईबाई मगरे, यशोदा जाधव, मिताली जाधव, रंजना दाभाडे, कमलबाई मगरे, शोभाबाई साबळे, साळूबाई मगरे, आशा दाभाडे, रंजना मगरे, मिना मगरे यांसह अनेकजण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन इंगळे यांनी केले तर सोपान जावळे यांनी उपस्थिताचे आभार मानले.

## भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी उद्धव जायभाये

### जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनानुसार चनेगाव येथील उद्धव जायभाये यांची जालना जिल्हा भाजपा ओबीसी मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली असून जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे यांच्या हस्ते जायभाये यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.
उद्धव जायभाये हे भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते असून केंद्रीय राज्यमंत्री ना.रावसाहेब दानवे, आ. संतोष पाटील दानवे, आ.नारायण कुचे ,जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ते भारतीय जनता पार्टीचे काम करत आले आहेत. आज त्यांची भाजपा ओबीसी मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.
भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, घनसावंगी विधानसभा प्रमुख सतिष घाटगे, राज्य कार्यकारिणी सदस्य रामेश्वर भांदरगे, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, जिल्हाध्यक्ष कपिल दहेकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष भागवत बावणे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव जगताप यांच्या उपस्थित जायभाये यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. त्यांच्या या निवडीबद्दल, शेषराव जायभाये, प्रेमनाथ सानप, गणेश मुटकुळे, पुंजाराम निहाळ, जिवन घुगे, विठ्ठल घुगे, कोंडीबा घुगे, प्रल्हाद जायभाये, शिवाजी तायडे परमेश्वर कायंदे, प्रल्हाद तायडे, पत्रकार दिपक घुगे, काकासाहेब निहाळ, रामेश्वर घुगे,रामदास काफरे,सदाशिव जायभाये, ज्ञानेश्वर मुटकुळे,कृष्णा मुटकुळे,संतोष शेळके, सुभाष मुटकुळे, कृष्णा बकाल व मित्र परिवाराच्या वतीने उद्धव जायभाये यांचे अभिनंदन करण्यात आले.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर